cmyk

## संपादकीय

### विषय एकदाचा निकालात निघावा.

जातीय जनगणनेचा आधार घेऊन ६५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आलेली आरक्षणाची मर्यादा रद्द करण्याचा न्यायालयाचा निर्णय हा बिहारमधील नितीशकुमार सरकारसाठी मोठा धक्काच म्हटला पाहिजे. नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जानेवारी २०२३ मध्ये जातनिहाय सर्वेक्षण केले. त्यामध्ये ओबीसींची एकूण लोकसंख्या ६३ टक्के, अनुसूचित जातींची १९.६५ टक्के, अनुसूचित जमातींची १.६८, तर सवर्णांची १५ टक्के इतकी लोकसंख्या नोंदविण्यात आली. यातील ३४ टक्के कुटुंबे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून, त्यांचे मासिक उत्पन्न ६ हजार ऊपयांहून कमी असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### सरोगेट मातांना मिळणार आता १८० दिवसांची रजा

नवी दिल्लीः भारत सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक महत्त्वाचा बदल केला असून आता सरोगसीद्वारे माता बनणाऱ्या महिलांनाही १८० दिवसांची प्रसूती रजा मिळणार आहे. केंद्रीय नागरी सेवा नियम, २०२४ जारी करून सरकारने हा नवीन नियम लागू करण्यात आला आहे. दोनपेक्षा कमी मुले असतील तरच त्यांना या नियमाचा लाभ सरकारी कर्मचाऱ्यांना घेता येणार आहे. याशिवाय जर एखादा सरकारी कर्मचारी सरोगसीद्वारे पिता बनला आणि त्याला दोनपेक्षा कमी मुले असतील तर त्याला मुलाच्या जन्मानंतर सहा महिन्यांच्या आत १५ दिवसांची पितृत्व रजा मिळेल. हे नवीन नियम १८ जूनपासून लागू झाले आहेत.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–७४ सोमवार दि.२४ जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

# तेलंगणाप्रमाणे महाराष्ट्रातही कर्जमाफी द्या..!

## » किसान सभेची रोखठोक मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**तेलंगणात काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफीचा करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात देखील तशी कर्जमाफी व्हावी, अशी मागणी किसान सभेने केली आहे. तेलंगणात काँग्रेस सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेत आपले आश्वासन पाळले आहे. याचे देशभरात कौतूक होत आहे.**

तेलंगणामध्ये काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात देखील कर्जमाफी व्हावी, अशी आमची मागणी असल्याचे वक्तव्य किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी केले आहे. याआधी कर्जमाफी करण्यात आली मात्र, त्यात अटी शर्ती इतक्या लागू केल्या की लाखो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले होते. त्यामुळे आता जर सरकार




कर्जमाफी करणार असेल तर अटी शर्तींच्या बाबतीत सरकारने योग्य तो निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांची फसवणूक करु नये असे त्यांनी म्हटले आहे. राज्यात शेतकरी संपानंतर आणि महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यानंतर दोन वेळा शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आली होती. मात्र, अटी शर्तीमुळे अनेक शेतकरी वंचित राहिले आहेत. नियमित कर्ज भरणारे शेतकरी देखील प्रोत्साहनपर अनुदानापासून वंचित असल्याचे अजित नवले म्हणाले. लोकसभा निवडणुकीत त्याचे प्रतिबिंब उमटल्याचे नवले यांनी सांगितले. आता पुन्हा एकदा राज्य सरकार शेतकरी कर्जमाफी करणार अशी चर्चा सुरू आहे. मागील दोन कर्जमाफीच्या वेळी झालेला घोळ पाहता अगोदरच्या कर्जमाफीत पात्र शेतकऱ्यांचा आणि नियमित कर्ज भरणाऱ्यांचा ◀◀ पान २ वर

### तेलंगणात ४० लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी

*तेलंगणामधील काँग्रेस सरकारने ४० लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री रेवंथा रेड्डी यांनी ३१ हजार कोटींच्या शेती कर्जमाफीला मंजुरी दिली आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची घोषणा काँग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात दिली होती. त्याप्रमाणे सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. तेलंगणा मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. यात ३४ हजार कोटी रुपयांच्या कृषी कर्ज माफीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. १५ ऑगस्टपूर्वी शेतकऱ्यांचे कर्ज सरकार माफ करेल, असे आश्वासन मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी दिले आहे.*

# मराठा महासंघाचा जरांगेंना पाठिंबा

## फडणवीसांचे कौतुक, भुजबळांवर टीका, ब्राह्मण नेत्यांकडूनच मराठा समाजाला भरपूर मिळाल्याचा दावा

**नागपूर । प्रतिनिधी**

**अखिल भारतीय मराठा महासंघाला पुढच्या वर्षी १२५ वर्षे पूर्ण होत असताना रविवारी मराठा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची एक बैठक नागपुरात पार पडली. या बैठकीनंतर मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप जगताप यांनी विविध विषयांवर प्रतिक्रिया दिली. त्यामध्ये, मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे यांना आपला पाठिंबा असल्याचें जगताप यांनी म्हटले. तर, ब्राह्मण नेत्यांकडूनच मराठा समाजाला भरपूर मिळाले, मराठा नेत्यांकडून अपेक्षाभंग झाल्याचेही त्यांनी म्हटले.**

आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा वाढवा, ही आमची पूर्वीपासूनची मागणी असून पटेल, जाट, कर्मी, वानियार यांनी आरक्षणाची मागणी लावून धरली आहे. देशातील नऊ राज्यांत आरक्षणाची मागणी आहे. समाज वंचित असून मर्यादा वाढवली तर सर्वांचे प्रश्न सुटतील. मराठा हे मोठे भाऊ, ज्या लहान भावाला चुकीने का होईना, ताटात काही दिले ते परत घेण्याचे आमच्या ध्येय धोरणात नाही. म्हणून आमची मागणी मर्यादा वाढवणे ही आहे. आम्हाला फडणवीसांनी निवडणुकीच्या अगोदर आश्वासन दिले आहे. म्हणून आम्ही आमची जी काही खारीची ताकद होती ती भाजपच्या मागे लावली, असे जगताप यांनी म्हटले. मनोज जरांगे यांना आमचा शंभर टक्के पाठिंबा आहे. राज्य शासनाच्या हातात काही नाही. भुजबळ, हाके, जरांगे आणि मी आणि सगळे राजकीय पक्षांचे नेते म्हणजे शिंदे, अजित दादा सगळ्यांनी मिळून पंतप्रधानांना साकडे घाला. फक्त एक दिवसाचा प्रश्न आहे. आता अधिवेशन सुरू होत आहे. अधिवेशनात एक ठराव पारित करायचा आहे, तो राष्ट्रपतींकडे पाठवायचा आहे, राष्ट्रपतींकडून आला की अध्यादेश काढायचा आहे. मर्यादा पन्नास ऐवजी ७५ टक्के वाढवली तर देशातल्या सगळ्या वंचितांना आरक्षण मिळेल. ◀◀ पान २ वर

# ..तर मुस्लिमांनाही ओबीसीतूनच आरक्षण द्यावे – मनोज जरांगे

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मुस्लीम समाजाच्याही कुणबी सरकारी नोंदी निघाल्या आहेत. लिंगायत, मारवाडी, ब्राह्मण, लोहार समाजाच्याही कुणबी नोंदी निघाल्या आहेत. मग मुस्लिमांनाही ओबीसीतूनच आरक्षण मिळायला पाहिजे. त्यांच्यावरही अन्याय व्हायला नको. आता जे कायद्याने बोलायचे ते कायद्याने बोला, अशी मागणी राज्य सरकारकडे मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांनी केली. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करा, अन्यथा विधानसभेला गुलाल रुसेल, असा इशारा त्यांनी दिला. जरांगे यांनी रविवारी (दि.२३) रुग्णालयात माध्यमांशी संवाद साधला.**



जरांगे पुढे म्हणाले, मुस्लिमांच्या नोंदी कुणबी म्हणून झाल्या असतील तर राज्यातील सर्व मुस्लिमांना कुणबी म्हणून ओबीसीतून आरक्षण दिले पाहिजे. ते आरक्षण कसे देत नाही तेच मी, बघतो. सरकारने कायद्याप्रमाणे विचार करून सडेतोड भूमिका घेणे गरजेचे आहे. मराठवाड्यातला मराठा समाज हा कुणबी आहे, त्याचे रेकॉर्ड आहे. मात्र ते तपासले जात नाही ते तात्काळ तपासायला सुरुवात करा, असे जरांगे म्हणाले.

या देशात आणि राज्यात फक्त मराठ्यांच्या सरकारी नोंदी आहेत. त्यामुळे मराठ्यांना १३ जुलैच्या आत आरक्षण देणे सरकारला बंधनकारक आहे. १९६७ नंतर आरक्षणात समाविष्ट केलेल्या जातीच्या नोंदी नाहीत. मग कशाच्या आधारे तुम्ही त्यांना १६ टक्के आरक्षण दिले. आमच्या पाठीत खंजीर खुपसून दिले ना? इतके दिवस आम्ही भाऊ म्हणून वागलो. तुम्ही प्रत्येक वेळी आमच्या ताटात विष कालवायचे काम करत आला आहात. असा घणाघात जरांगे यांनी ◀◀ पान २ वर

### घटनेत दिलेले आरक्षण सोडून इतर आरक्षण रद्द करा

कसल्याही नोंदी नसतानाही बेकायदेशीर आणि बोगस आरक्षण ज्यांना दिले ते तुम्ही कायदेशीर म्हणत आहात. मग डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत दिलेले आरक्षण सोडून इतर आरक्षण रद्द करून टाका. या लोकांना दिलेले १६ टक्के आरक्षण रद्द करा, अन्यथा या विरोधात आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा जरांगे यांनी सरकारला दिला.



### सुनीता विल्यम्स अडकल्या अवकाशात!

न्यूयॉर्कः भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स अन्य एका सहकाऱ्यासह तिसऱ्यांदा अवकाशात रवाना झाल्या. यासह या दोघांनी बोईंग कंपनीच्या स्टारलाइनर अंतराळयानात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले सदस्य बनून इतिहास रचला. आता त्यांना आयएसएसमधून परत येण्यात अडचण येत आहे. अंतराळयानामधील तांत्रिक अडचणींमुळे त्यांना पृथ्वीवर परत येण्यास विलंब होत आहे. लवकरच अंतराळ यानातील तांत्रिक अडचणी सोडवून ते पृथ्वीवर परत येतील असे अभियंत्यांनी ◀◀ पान २ वर

# शिक्षकांना शेअर बाजाराप्रमाणे भाव लावला जातोय

## संजय राऊतांचा मुख्यमंत्र्यांवर जोरदार हल्लाबोल

**मुंबई । प्रतिनिधी**

**नाशिक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जळगावातील सभेनंतर महायुतीच्या नेत्यांकडून शिक्षक, कर्मचारी, मुख्याध्यापक आणि संस्था चालकांना पैसे वाटप करण्यात आल्याचा गंभीर आरोप ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी व्हिडीओ शेअर करत केला. यावरून राजकीय वातावरण तापले असून आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली आहे.**

संजय राऊत म्हणाले की, मुख्यमंत्री नाशिकला येऊन गेले. ते कशासाठी येतात हे सर्वांनाच माहिती आहे. शेअर बाजाराप्रमाणे शिक्षकांना भाव लावला जात आहे. शिक्षकांना विकत घेऊ नका, परंपरा मोडू नका. लोकसभा निवडणुकीत हेलिकॉप्टरमधून २० कोटी उतरवले हे सगळ्यांनी पाहिले. पदवीधर, शिक्षक वर्गाला या बाजारात ओढू नका. निवडणूक आयोग उघड्या डोळ्यांनी व्यभिचार पाहत आहे. लोकशाहीची हत्या होत आहे. या निवडणूक आयोग धृतराष्ट्राप्रमाणे वागत आहे, असे ते म्हणाले. ◀◀ पान २ वर

### निवडणूक आयोगात तक्रार करणार : सुषमा अंधारे

याबाबत सुषमा अंधारे म्हणाल्या की, जळगावात दराडे यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा झाली. ही सभा झाल्यानंतर सभेला उपस्थित असलेले शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना पैसे वाटत असतानाचा व्हिडिओ मी पोस्ट केलेला आहे. सकाळपासून शिंदे गटाचे नेते सांगत आहेत की, असे काही घडले नाही. सभेला उपस्थित असणाऱ्या अपक्ष उमेदवारांनी हे व्हिडिओ काढले आहेत. याबाबत आणखी व्हिडिओ आहेत आणि मी याची रीतसर निवडणूक आयोगात तक्रार करणार आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

# नीट–युजी पेपर फुटीचा तपास सीबीआयकडे

## शिक्षण मंत्रालयाने केली अधिकृत तक्रार




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

सीबीआयने ५ मे रोजी झालेल्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या नीट युजी मध्ये झालेल्या कथित अनियमिततेच्या संदर्भात एफआयआर दाखल केला आहे, असे अधिकाऱ्यांनी रविवारी २३ जून रोजी सांगितले. केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने शिक्षण विभागाच्या तक्रारीवरून परीक्षेच्या संचालनातील कथित अनियमिततेच्या चौकशीसाठी गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणातील इतर प्रकरणे ताब्यात घेण्यासाठी एजन्सीने प्रक्रिया सुरू केली आहे. चाचणीतील कथित अनियमिततेची चौकशी एजन्सीकडे सोपवली जाईल असे केंद्राने जाहीर केल्यानंतर एक दिवसानंतर हे झाले आहे. ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२२ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३.५० क्विंटल | २,३५० | २,७१० | २,५३० |
| ज्वारी/हायब्रिड : ४४.०० क्विंटल | २,२४० | २,५५१ | २,३३७ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : ४.५० क्विंटल | ७,००१ | ८,०६१ | ७,५३१ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ३९.५० क्विंटल | २,४०० | २,८०१ | २,६१० |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ६.०० क्विंटल | ४,४६१ | ४,४७१ | ४,४६६ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,२०१ | ६,५०० | ५,८५० |

# काळाराम मंदिर पत्रकप्रकरणी सरकार गंभीर – फडणवीस

## पत्रक काढणाराही अनुसुचीत जातीचाच

**नागपूर । प्रतिनिधी**

नाशिक काळाराम मंदिर परिसरातील रहिवाशांना धमकी देणारे, निळे झेंडे लावू नका, अशा पत्रक प्रकरणी पोलिसांनी वेळीच वास्तव पुढे आणल्याने संभाव्य दंगल सदृश्य स्थिती टाळता आली. यापुढेही अशा घटना होऊ नयेत, यासाठी आम्ही अलर्ट असून डिजी, एसआयडीशी बोलणे झाले असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि.२३) माध्यमांशी बोलताना दिली. फडणवीस म्हणाले, काळाराम मंदिराच्या आसपास राहणाऱ्या ◀◀ पान २ वर



# २००५ नंतरच्या शिक्षकांच्या जून्या पेन्शनचा विचार होणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

**नाशिक। प्रतिनिधी**

राज्यातील २००५ आधीच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करून राज्य सरकारने शिक्षकांना दिलासा दिला होता. त्यानंतर २००५ नंतर रूजू झालेल्या शिक्षकांना देखील जुनी पेन्शन योजना लागू व्हावी अशी मागणी शिक्षकांकडून केली जात होती. ती मागणी लवकरच मान्य केली जाईल. २००५ नंतरच्या शिक्षकांसाठी जून्या पेन्शनचा विचार करू, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (ता.२३) दिले. जळगाव येथे नाशिक शिक्षक मतदारसंघातील महायुतीचे ◀◀ पान २ वर



# जगभरातच वाढलाय उष्णतेचा धोका !

## भारतासह जगात यंदा हजारो लोकांचे बळी, शास्त्रज्ञांचा दावा चिंता वाढविणारा

**न्यूयॉर्क । वृत्तसंस्था**

**गेली अनेक वर्षे वाढत असलेल्या तापमानवाढीमुळे जीवघेणी गरमी वाढण्याचे प्रमाण तब्बल ३५ पट वाढल्याचे जागतिक तापमानवाढीबाबत अभ्यास करणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञांच्या गटाने केलेल्या अभ्यासात पुढे आले आहे. सर्वांची चिंता वाढविणारा अहवाल समोर आला असून यंदाच्या उन्हाळ्यात भारतात तसेच जगाच्या इतर भागात मिळून हजारो लोकांचे बळी गेले आहेत.**



अहवालात असेही म्हटले आहे की, चालू वर्षी आजवरचे सर्वाधिक उष्ण वर्ष ठरले आहे. पृथ्वीच्या उत्तर गोलार्धातील बहुतेक प्रदेशांमध्ये पावसाळ्याचे आगमन होण्याच्या आधीच भीषण उष्णतेचा प्रकोप झालेला पहायला मिळतो. दरम्यान जगविख्यात भविष्यवेत्याने ४५० वर्षांपूर्वी त्याचे पुस्तक लेस प्रोफेटीजमध्ये जगातील अशा काही घटनांचे ◀◀ पान २ वर

### भविष्यात धोका वाढणार?

» उष्णता मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांना हीट स्ट्रोकचा त्रास होतो. यात शरीराला थंड ठेवणारी यंत्रणा पूर्णपणे मोडून पडते. वेळीच उपाय न केल्यास व्यक्तीचा मृत्यू ओढवतो. दुसरीकडे संपूर्ण जगभर हरितगृह वायू मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जीवष्म इंधन जाळल्याने मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण केली जात आहे. यामुळे भविष्यात जीवघेणी उष्णता निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे.

cmyk

cmyk



## अग्रलेख

# विषय एकदाचा निकालात निघावा...

जातीय जनगणनेचा आधार घेऊन ६५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आलेली आरक्षणाची मर्यादा रद्द करण्याचा न्यायालयाचा निर्णय हा बिहारमधील नितीशकुमार सरकारसाठी मोठा धक्काच म्हटला पाहिजे. नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जानेवारी २०२३ मध्ये जातनिहाय सर्वेक्षण केले. त्यामध्ये ओबीसींची एकूण लोकसंख्या ६३ टक्के, अनुसूचित जातींची १९.६५ टक्के, अनुसूचित जमातींची १.६८, तर सवर्णांची १५ टक्के इतकी लोकसंख्या नोंदविण्यात आली. यातील ३४ टक्के कुटुंबे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून, त्यांचे मासिक उत्पन्न ६ हजार ऊपयांहून कमी असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले. त्यानंतर लोकसंख्येच्या प्रमाणात जातनिहाय आरक्षण वाढविण्याची भूमिका बिहारमधील नितीशकुमार यांच्या आघाडी सरकारकडून घेण्यात आली. आर्थिक दुर्बल घटकांसाठी आधीच १० टक्के आरक्षणाची तजवीज आहे. त्याचा विचार करता बिहारमधील आरक्षणाचा आकडा हा ७५ टक्क्यांवर जात होता. परंतु, हा निर्णय नागरिकांच्या समानतेचे उल्लंघन असल्याचे नमूद करीत न्यायालयाने तो रद्दबातल ठरविला आहे.

न्यायालयाचा हा निकाल अनपेक्षित ठरू नये. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सहानी खटल्यात ५० टक्के आरक्षणाची मर्यादा घालून दिली आहे. त्याचा दाखला देतच मराठा आरक्षणाचा विषयही फेटाळण्यात आला होता. आता बिहारमध्येही याच खटल्याचा आधार घेण्यात आल्याचे दिसून येते. हे पाहता आरक्षणाची वाट किती बिकट आहे, याची प्रचिती यावी. यातून महाराष्ट्र सरकारलाही योग्य तो बोध घेणे क्रमप्राप्त ठरेल. महाराष्ट्रातही मागच्या काही वर्षांपासून मराठा समाजासह अन्य समाजघटक आरक्षणावरून आक्रमक झाले आहेत. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे, सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी भूमिका घेत मनोज जरांगे यांनी रान पेटवले आहे. सरकारने महिनाभराची मुदत मागितल्यानंतर जरांगे यांनी आपले उपोषणास्त्र तात्पुरते म्यान केले आहे. दुसरीकडे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यास ओबीसी नेत्यांनी विरोध दर्शविला आहे. त्याकरिता लक्ष्मण हाके यांनीही आंदोलन सुरू केले असून, ओबीसी संघटनाही मागच्या काही दिवसांपासून रस्त्यावर उतरलेल्या पहायला मिळतात. त्यात धनगर आरक्षणाची मागणीही पुढे आली आहे. धनगर समाजाला एससी कोट्यातून आरक्षण मिळावे, यासाठी या समाजानेही एल्गार पुकारल्याचे दिसते. परंतु, पाटणा उच्च न्यायालयाच्या आरक्षण मर्यादा वाढविण्यासंदर्भातील निर्णयाने महाराष्ट्रात सुरू असलेल्या आरक्षणाच्या लढ्याचे काय होणार, हा प्रश्न अधिक गडद झाला आहे. दाखल्यावर कुणबी मराठा असा उल्लेख असेल, तर ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळते. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळावे. मराठा समाजातील व्यक्तींच्या नातेवाईकांनाही कुणबी प्रमाणपत्र मिळावे, असे जरांगे यांचे म्हणणे आहे. त्यानुसार राज्य सरकारने मोहीम हाती घेतली असता त्यात ५४ लाख लोकांच्या नोंदी सापडल्या आहेत. ओबीसी आरक्षणाची मर्यादा लक्षात घेतली, तर कुणबी नोंदी सापडलेल्या मराठ्यांना आरक्षण मिळू शकेल का, याबाबत साशंकता व्यक्त करण्यात येते. ती चुकीची म्हणता येणार नाही. २०१३ साली काँग्रेस व राष्ट्रवादी सरकारने मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, हा निर्णय कोर्टात टिकू शकला नाही. त्यानंतर फडणवीस सरकारनेही १६ टक्के आरक्षण जाहीर केले. परंतु, मुंबई उच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा खाली आणली. त्यानुसार नोकऱ्यांमध्ये १३ टक्के व शिक्षणात १२ टक्के आरक्षण कायम ठेवण्यात आले. पण यातून मराठा समाज हा मागास असल्याचे सिद्ध होत नाही, असे निरीक्षण नोंदवून हादेखील निर्णय न्यायालयाने रद्द केला होता. फेब्रुवारी २०२४ मध्ये राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालानुसार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने १० टक्के आरक्षण दिले. त्यालाही उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. एकूणच मागच्या दहा ते बारा वर्षांपासून मराठा आरक्षणावर घोषणांपलीकडे काही झालेले नाही. बिहार सरकारचा निर्णय पाहता महाराष्ट्रातील आरक्षण टिकेल, असे म्हणणे हा भाबडेपणाच ठरावा. महाराष्ट्रात आजमितीला ५० टक्के आरक्षणाची मर्यादा पूर्ण केली आहे. तामिळनाडूचे उदाहरण दिले जात असले, तरी ही तुलना करता येत नाही. तामिळनाडूमध्ये ६९ टक्के इतके आरक्षण आहे. तेथे यासंदर्भात घटनादुरूस्ती करण्यात आल्याचे दिसते. नवव्या परिशिष्टात एखाद्या कायद्याचा समावेश करायचा असेल, तर राज्यघटनेत दुऊस्ती करावी लागते. तामिळनाडूत मागासवर्गीयांची संख्या जास्त आहे, याकडे लक्ष वेधत तेथील सरकारने ही घटनादुऊस्ती करून घेतली आहे. त्यामुळेच तेथील कायदा आजवर टिकून राहिला असल्याचे घटनातज्ञ सांगतात. एकूण आरक्षण हा विषय अतिशय गुंतागुंतीचा आहे. महाराष्ट्रातील परिस्थिती बघता हा तिढा सोडविणे, ही अत्यंत जटील समस्या असेल. हा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्राला कायद्यात बदल करावा लागेल. केवळ बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही. आंदोलने मर्यादेबाहेर जाणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. खरे तर हा एका राज्यापुरता विषय नाही. वेगवेगळ्या राज्यात आरक्षणाचा प्रश्न वेळोवेळी उग्र रूप धारण करीत असल्याचे आपण पाहिले आहे. त्यामुळे या आघाडीवर भविष्यात भूमिका घेणे आवश्यक ठरते. काँग्रेससाख्या पक्षाने जातीय जनगणना करण्याची मागणी केली आहे. सर्व समाजघटकांचे आर्थिक सर्वेक्षण होणे आवश्यक असल्याचीही मांडणी करण्यात येत आहे. हे बघता जातीय जनगणनेच्या पातळीवरही सकारात्मक दृष्टीकोन ठेवायला हरकत नाही. दिवसेंदिवस जगण्याची लढाई कठीण होत आहे. गरीब-श्रीमंत ही दरी वाढत आहे. त्यातून आरक्षणाची लढाई अधिक धारदार होताना दिसते. म्हणूनच हा विषय एकदाचा निकालात काढला पाहिजे.

## छत्तीसगडमध्ये आयईडी स्फोटात २ जवान शहीद

**गडचिरोली । प्रतिनिधी**

**छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यातील सिल्गर आणि टेकुलगुडम दरम्यान माओवाद्यांनी मोठा आयईडी स्फोट घडवला. या स्फोटात २ जवान शहीद झाल्याची माहिती समोर आली आहे तर अनेक जवान जखमी झाले आहेत. एकीकडे सुकमा जिल्ह्यातील कोराजगुडा जंगलात राबविण्यात आलेल्या नक्षलविरोधी अभियानाला मोठे यश मिळाले असताना दुसरीकडे माओवाद्यांनी जवानांच्या ट्रकला लक्ष्य केले. नक्षलविरोधी अभियानावर असलेल्या सुरक्षा रक्षकांवर हा हल्ला करण्यात आला. सध्या पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.**

२०१ कोब्रा वाहिनीची ॲडव्हान्स पार्टी जागरगुंडा पोलिस स्टेशन हद्दीतील कॅम्प सिल्गर येथून आरओपी ड्युटी दरम्यान ट्रक आणि दुचाकीने कॅम्प टेकलगुडेमकडे जात होते. याचवेळी नक्षलवाद्यांनी सिल्गर ते टेकलगुडेम या मार्गावर आयईडी पेरला होता. दरम्यान, आज दुपारी ३ च्या सुमारास २०१ कोब्रा कॉर्प्सच्या एका ट्रकवर आयईडी स्फोट घडवून आणला. ज्यामध्ये चालक आणि सहचालक जागीच शहीद झाले असून उर्वरित सर्व जवान सुरक्षित असल्याची माहिती आहे. यात शहीद जवानांची नावे विष्णू आर आणि शैलेंद्र अशी सांगण्यात येत आहेत. सुकमा जिल्ह्यातील कोराजगुडा जंगलात राबविण्यात आलेल्या नक्षलविरोधी अभियानाला मोठे यश मिळाले. कोराजगुडा जंगलात माओवादी चक्क बनावट नोटा बनवत असल्याचे आढळून आले. यात ५०, १००, २०० आणि ५०० रुपयांच्या बनावट नोटांचे नमुने आढळून आले. पश्चिम बस्तर भागात २०२२ पासून माओवादी बनावट नोटा छापण्याचे प्रशिक्षण देत होते, असे तपासातून पुढे आले. सुकमा जिल्ह्यातील जंगलात बनावट नोटांची छपाई सुरू असल्याची माहिती छत्तीसगड पोलिसांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून कारवाई करण्यात आली. जवानांच्या संयुक्त दलाला या कारवाईत मोठे यश मिळाले. गडचिरोलीतील जहाल माओवादी आणि जिल्ह्यातील नक्षली चळवळीचा म्होरक्या समजल्या जाणा-या गिरधरने आज पत्नीसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले. यावेळी नक्षली दाम्पत्याला पुनर्वसनासाठी २५ लाख रुपयांची मदत देण्यात आली.

# परळीचे भूमिपुत्र वर्दीतला देव माणूस दत्ता गायकवाड यांनी केले ७५ वेळा रक्तदान

## वयाच्या १८ वर्षापासून अविरत सेवा सुरु; सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव

**परळी । प्रतिनिधी**

**परळी वैजनाथ येथील भुमीपूत्र असलेले व सध्या नांदेड पोलिस दलातील कर्मचारी दत्ता गायकवाड यांनी वयाच्या १८ व्या वर्षापासून ७५ वेळा रक्तदान समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या कार्याचे सर्वस्तरातून कौतुक केले जात आहे.**



१४ जुलै हा दिवस जागतिक रक्तदाता दिवस म्हणून संपूर्ण देशभरात साजरा केला जातो. हा दिवस जागतिक आरोग्य संघटनेच्या नेतृत्वाखाली हा दिन साजरा केला जातो. परळीचे भूमीपूत्र असलेले व नांदेड पोलिस दलातील पोलिस कर्मचारी श्री दत्ता गायकवाड यांनी आजपर्यंत ७५ वेळा रक्तदान करून अनेकांना जीवदान दिल्याची कहाणी खरोखरच प्रेरणादायी आहे. या कर्मचार्याने वयाच्या १८ व्या वर्षापासून अविरतपणे रक्तदान करण्याची सेवा सुरू ठेवली आहे. त्यांच्या या कार्याचे सर्वस्तरातून कौतुक केले जात आहे. परळीचे भुमीपूत्र असलेले व सध्या नांदेड पोलिस दलातील पोलिस कर्मचारी दत्ता शिवाजीराव गायकवाड यांनी २००४ पासून सुरू केलेली सेवा आजतागायत मागील २० वर्षांपासून रक्तदानाची सेवा बजावत आहे. दरम्यान पोलिस कर्मचारी दत्ता गायकवाड यांनी सांगितले की, ग्रुपच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे काम शहरात करतो. समाजामध्ये रक्तदान केल्यामुळे शरीराला धोका होतो असा गैरसमज असून रक्तदानामुळे आपल्याला कोणाचा जीव वाचवण्याची संधी मिळते तसेच आपले आरोग्य सुदृढ होते हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे असे म्हटले आहे. दत्ता गायकवाड यांनी आजपर्यंत अनेकांना जीवदान दिल्याची ही घटना केवळ कौतुकास्पद नाही, तर प्रेरणादायीही आहे. मागील २० वर्षांपासून त्यांनी समाजातील गरजू लोकांना मदतीचा हात दिला आहे. एक युनिट रक्तामुळे तीन जीव वाचू शकतात. अशा परिस्थितीत, ७५ वेळा रक्तदान केल्याने असंख्य लोकांना नवीन जीवन मिळाले असेल. या पोलिस कर्मचार्याने त्यांच्या व्यस्त आणि तणावपूर्ण कामातही वेळ काढून नियमित रक्तदान केले आहे.

# नोकरशहांची फेरबदल करणे हा उपाय नाही

## नीट पेपरफुटी प्रकरणी मल्लिकार्जून खर्गे यांची टीका

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**मागील काही दिवसापासून नीट-युजी आणि युजीसी-नेट परिक्षेच्या पेपरफुटी प्रकरणी केंद्र सरकारडून सातत्याने घुमजाव सुरु आहे. त्यातच केंद्र सरकारने एनटीएचे महासंचालक सुबोधकुमार सिंग यांची संचालक पदावरून उचबांगडी केली. यावरून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केंद्र सरकारवर टीकास्त्र सोडत म्हणाले की, नोकरशहांची फेरबदल करणे हा भारतीय जनता पक्षाने कुजलेल्या शिक्षण व्यवस्थेतील ''मुळ समस्येवर'' उपाय नाही आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या घोटाळ्यातील पैसे उच्च स्तरीय अधिकाऱ्यांच्या दारात थांबतात असा गंभीर आरोपही यावेळी केला.**



पेपर लीक झाल्याबद्दल विरोधकांकडून सातत्याने केंद्र सरकारवर टीका करण्यात येत आहे. यादरम्यान, नॅशनल टेस्टिंग एजन्सीचे प्रमुख सुबोध कुमार यांची बदली पी.के. खरोला यांनी केली आहे, जे सध्याचे अध्यक्ष आणि इंडिया ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशनचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. मल्लिकार्जून खर्गे पुढे बोलताना म्हणाले की, नीट घोटाळ्यात मोदी सरकारच्या उच्चपदस्थांच्या दारात पैसा थांबला आहे. भाजपाने कुजवलेल्या शिक्षण व्यवस्थेतील स्थानिक समस्येवर नोकरशहांची फेरबदल करणे हा उपाय नाही. एनटीए ही स्वायत्त संस्था असल्याचा अंदाज व्यक्त केला जात होता, परंतु प्रत्यक्षात ती भाजपा/आरएसएसच्या विकृत हितासाठी बनवण्यात आली होती, असा आरोपही त्यांनी केला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे पुढे म्हणाले, पेपर लीक, भ्रष्टाचार, अनियमितता आणि शिक्षण माफियांनी आमच्या शिक्षण व्यवस्थेत घुसखोरी केली आहे. विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी, मोदी सरकारला जबाबदार धरले पाहिजे. आता परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. गेल्या १० दिवसांत ४ परीक्षा एकतर रद्द किंवा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या उशीराने सरकारला सुचलेल्या शहाणपणामुळे असंख्य तरुण विद्यार्थ्यांना होत असलेल्या त्रासाचा परिणाम मात्र केंद्र सरकारवर पडतच नाही. केवळ सरकार विद्यार्थ्यांना फक्त त्रासच देत राहणार असा खोचक टोलाही यावेळी त्यांनी लगावला.

# जिजामाता योग क्लासचा योगा दिन उत्साहात साजरा

## योगा क्लासच्या माध्यमातून महिलांचे सशक्तिकरण-एपीआय जंजाळ

**गेवराई । प्रतिनिधी**

**जागतिक योग दिनानिमित्त जिजामाता योग क्लासच्या वतीने शहरात ''महिला सशक्तीकरण'' आंतरराष्ट्रीय योग दिन २०२४ कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन उपस्थित विदेशातही योग च्या माध्यमातून लोकांना आरोग्य दिले असे राहुल पानखडे, गेवराई पोलीस स्टेशनचे एपीआय संतोष जंजाळ, आयोजक गीताभाभी पवार, पतंजली योगशिक्षक राजेंद्र बरकसे, अशोक गायकवाड, राम चाळक, मुनेश्वर, जिजामाता योगा क्लास प्रमुख सदस्य सौ.रत्नमाला नानी मोटे यांच्या हस्ते करण्यात आले. या विशेष योग शिबिरात दोनशे पेक्षा जास्त महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.**



जागतिक योग दिनानिमित्त जिजामाता योग क्लासच्या वतीने शहरात ''महिला सशक्तीकरण'' आंतरराष्ट्रीय योग दिन २०२४ कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन उपस्थित विदेशातही योग च्या माध्यमातून लोकांना आरोग्य दिले असे राहुल पानखडे, गेवराई पोलीस स्टेशनचे एपीआय संतोष जंजाळ, आयोजक सौ. गीताभाभी पवार पतंजली योगशिक्षक बरकसे, अशोक गायकवाड, राम चाळक, मुनेश्वर,जिजामाता योगा क्लास प्रमुख सदस्य सौ.रत्नमाला नानी मोटे यांच्या हस्ते करण्यात आले. या विशेष योग शिबिरात दोनशे पेक्षा जास्त महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे सर्व महिलांनी विविध प्रकारचे ड्रेस कोड परिधान करून योगा केल्याने या कार्यक्रमाला आणखी चांगल्या प्रकारचे स्वरूप आले. आजच्या धकाधकीच्या, वेगवान युगात योगासने अत्यंत महत्त्वाची आहेत, मात्र जास्तीत जास्त महिलांनी योगा शिकल्यास त्याचा घरासाठीच नव्हे तर, समाजालाही मोठा फायदा होईल व या माध्यमातून महिला सशक्तिकरण करण्यात येत असून याचा फायदा महिलांना होत आहे असे मत प्रमुख पाहुणे एपीआय संतोष जंजाळ यांनी व्यक्त केले. तसेच तणावमुक्त राहण्यासाठी प्रत्येकाने रोज ठराविक वेळ देण्याची गरज असल्याचे आयोजक गीता भाभी पवार यांनी म्हटले आहे. करो योग ,रहो निरोग जागतिक योग दिनाच्या निमित्ताने, जिजामाता योग क्लासच्या माध्यमातून, आदरणीय गीता भाभी यांच्या संकल्पनेतून, योग दिनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. फक्त योग दिनासाठीच योग केला जात नसून महिलांच्या प्रेरणास्थान सौ.गीता भाभी पवार यांच्या माध्यमातून वर्षभर महिलांसाठी योग अभ्यास वर्ग चालू आहे. अनेक महिलांचे आजार या माध्यमातून दूर झाले असून, जागतिक योग दिनाच्या माध्यमातून सर्व महिला एकत्र करून वर्षभर हा उपक्रम राबवला जातो या कार्यक्रमासाठी अनेक महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# पान १वरून...

### तेलंगणाप्रमाण

शेतकऱ्यांचा प्राधान्याने विचार करावा असे शेतकऱ्यांची मागणी आहे. जे अपात्र ठरले त्या त्रूटी दूर कराव्यात. तसेच कर्जमाफीची नुसती घोषणा करु नये, तर त्याची अंमलबजावणी करावी अशी मागणी होत आहे. सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या या महाराष्ट्रात होतात, शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी हा एक उत्तम पर्या असून, त्याची चांगल्या पद्धतीची कर्जमाफीची योजना राज्य सरकारने राबवावी.

-------------

### ..तर मुस्लिमांनाही ओबीसीतूनच

सरकारवर केला. माळी समाजाला व्यवसायाच्या आधारावर आरक्षण दिले असेल तर आम्ही देखील तुम्हाला आमचे व्यवसाय दाखवतो. मग त्यांना आरक्षण कसे दिले? याचे आम्हाला उत्तरं द्या, असा प्रश्न देखील जरांगे यांनी केला. फक्त मतदारसंघाची चाचपणी केली. मला खोटे बोलता येत नाही. आम्ही कोणत्याही मतदारसंघाचे नाव घेतले नाही, आणि घेणारही नाही. कारण राजकारणात आम्हाला जायच नाही, तो आमचा मार्ग नाही. सरकारने आमच्या मागण्या १३ जुलैपर्यंत मान्य कराव्या. अन्यथा २८८ उमेदवार उभे करायचे की, पाडायचे ते आम्ही, समाजाच्या बैठकीत ठरवू असा इशारा त्यांनी दिला.

--------

### मराठा महासंघाचा जरांगेंना

पण काही स्वार्थी राजकारण्यांना तो नको आहे, म्हणून आमच्यात भांडणे लावायला कारण चाललं आहे. पण आम्ही भडकणार नाही, असे जगताप यांनी म्हटले.

--------

### नीट-युजी पेपर फुटीच

यापूर्वी २२ जून रोजी आरोग्य मंत्रालयाने नीट प्रवेश परीक्षा ''सावधगिरीचा उपाय म्हणून'' पुढे ढकलण्याची घोषणा केली होती, ती २३ जून रोजी सकाळी होणार होती त्याच्या काही तास आधी, सुबोध कुमार सिंग यांना नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या (एनटीए) महासंचालक पदावरून हटवण्याचा निर्णय घेण्यात आला, जे कथित पेपर लीक आणि नीट परीक्षा आणि इतर परीक्षांमधील अनियमिततेमुळे चर्चेत आले.

विद्यार्थ्यांची आणि विरोधकांची सततची मागणी मान्य करून, ५ मे रोजी झालेल्या नीट-युजी परीक्षेत फसवणूक आणि गैरप्रकार झाल्याच्या आरोपांची सर्वंकष चौकशी करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण ब्युरोकडे सोपवण्यात येईल, अशी घोषणा शिक्षण मंत्रालयाने केली होती. त्यात नमूद करण्यात आले आहे की केंद्र सरकारने सार्वजनिक परीक्षा (अयोग्य माध्यमांचा प्रतिबंध) कायदा, २०२४ लागू केला आहे, जो २१ जूनपासून लागू झाला आहे आणि दोषी आढळलेल्या व्यक्ती आणि संस्थांवर ''कठोर कारवाई'' केली जाईल असे वचन दिले आहे.

--------

### शिक्षकांना शेअर बाजाराप्रमाणे

ते पुढे म्हणाले की, दिंडोरीत भास्कर भगरे यांच्या विरोधात नाम साधर्म्य असणारा भगरे नावाचा उमेदवार समोरच्यांनी उभा केला होता. भास्कर भगरे यांच्या नावाप्रमाणे भास्कर भगरेला गुरुजी लावले नाही. तिसरी पास उमेदवाराच्या नावापुढे सर लावण्यात आले. त्याला पिपाणी चिन्ह दिले. लोकांची फसवणूक करून मत घेण्याचा प्रकार झाला. डमी उमेदवाराची पद्धत बंद व्हायला पाहिजे. लोकांना भ्रमित करून मत घेतली जातात. यातून मार्ग काढावा लागेल. संदीप गुळवे यांना मत द्यायचे तर डुप्लिकेटला दिले जाते. लोकांना उद्धव ठाकरे यांना मत द्यायचे होते मात्र धनुष्यबाणला मत दिली गेली.

-------------

### सुनीता विल्यम्स

सांगितले आहे. विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना घेऊन जाणारे बोईंगचे 'क्रू फ्लाइट टेस्ट मिशन' अनेक विलंबानंतर फ्लोरिडामधील केप कॅनाव्हेरल अंतराळ केंद्रावरून निघाले. अशा मोहिमेवर उड्डाण करणाऱ्या पहिल्या महिला म्हणूनही विल्यम्स यांनी इतिहास घडवला. भारतीय वंशाच्या बुच विल्मोर आणि सुनीता विल्यम्स स्टारलाइनर स्पेसक्राफ्टने आयएसएसवर पोहोचले होते. स्टारलाइनर स्पेसक्राफ्टचे रिटर्न मॉड्यूल आयएसएसच्या हार्मनी मॉड्यूलवर डॉक केले आहे. हार्मोनी मॉड्यूलमध्ये फक्त मर्यादित इंधन शिल्लक आहे.

----------

### २००५ नंतरच्या शिक्षकांच्या

उमेदवार किशोर दराडे यांच्या प्रचारार्थ आयोजित मेळाव्यात मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, आमदार संजय सावकारे, राजुमामा भोळे, मंगेश चव्हाण, लताताई सोनवणे, माजी आमदार चंद्रकांत पाटील यांच्यासह संस्थाचालकांसह मुख्याध्यापक, शिक्षण आणि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, माता-पित्यानंतर समाजात जर कोणाला सर्वाधिक आदराचे स्थान असेल तर ते शिक्षकांना. शिक्षक हे राज्याचा कणा आणि वैभव असल्याने त्यांना आपल्याला दुखवायचे नाही. हीच आमची भूमिका आहे. त्यामुळेच २००५ नंतर नोकरीवर रूजू होणाऱ्या शिक्षकांच्या जूनी पेन्शन लागू करण्याचा नक्की विचार केला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. तसेच शिक्षक हे भावी पिढी घडवण्याचे काम करतात. त्यामुळे राजकर्ते म्हणून शिक्षकांचे विविध प्रश्न सोडवणे आमचे कर्तव्य आहे. याच भावनेतून २००५ आधीच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू केली. तसेच २० टक्के वाढीव निधी देण्यासाठी ११६० कोटींची तरतूद केली. वैद्यकीय बिलासह पेन्शनसाठी १५०० कोटींची तरतूद करण्यात आल्याचेही शिंदे म्हणाले. तर पुढील काळात शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून शिक्षकांचे प्रश्न सोडवणाऱ्या व्यक्तीलाच विधानपरिषदेत पाठवा असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले.

------------

### काळाराम मंदिर पत्रकप्रकरणी

लोकांना धमकी देणारे पत्र काढण्यात आले होते. ते पत्र पब्लिश करणाऱ्याला अटक करण्यात आली आहे. दुसऱ्या व्यक्तीशी असलेल्या वैमनस्यातून हे दलित समाजाला धमकी देणारे ते पत्र होते. विशेष म्हणजे हे पत्रक काढणाराही अनुसूचित जातीचाच आहे. त्यामागे काय कारण आहे, हे शोधून काढले आहे. त्याच्याकडे चार मोबाईल दोन लॅपटॉप मिळून आले. यापाठीशी कोण आहे. दंगल घडवण्यासाठी त्याने हे पत्रक काढले आहे का? ज्याच्या नावाने पत्र काढले, त्याच्याशी त्याचे वैर असल्याचे, बदनाम करण्यासाठी त्यांनी पत्र काढल्याचे बोलले जात असल्याने या प्रकरणात नाशिक पोलीस सगळ्या बाबींची चौकशी करीत आहेत. त्या संदर्भात पूर्णपणे माहिती पोलिसांनी काढलेली आहे. मन दुषित करून कायदा सुव्यवस्था निर्माण होणारी परिस्थिती टळली आहे. हे पत्र काढून पत्र सोशल मीडियावर टाकायचे आणि लोकांमध्ये गैरसमजुती निर्माण करून दंगा घडवण्याचे प्रयत्न यापुढेही होऊ शकतात. काही राजकीय नेत्यांनी हे पत्र ट्विट केलं. अशा प्रकारच्या गोष्टींमध्ये शहानिशा न करता वस्तुस्थिती न तपासता तसे पत्र व्हारल केल्यास समाजात तेढ निर्माण होईल, असेही गृहमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

------------

### जगभरातच वाढलाय

भाकीत केले आहे की त्या वेळोवेळी खऱ्या ठरत आल्या आहेत. २०२४ मध्येही काय काय घडेल याचा अर्थ त्याच्या अनुयायांनी लावला होता. हा भविष्यवेत्ता नॉस्ट्रेदामस होता. त्याने २०२४ मध्ये उष्णतेची लाट येईल, हवामान बदल होऊन दुष्काळ पडेल असे म्हटले होते. आता भारत उन्हाच्या लाटांत होरपळत आहे.

cmyk

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. २४ जून २०२४



## जरांगे पाटलांना दिलेला शब्द राज्य सरकारने पाळावा

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण प्रश्नी मा. मनोज जरांगे पाटलांनी अनेक उपोषणे केली. उपोषणाचा परिणाम म्हणुन राज्य शासनाने विशेषतः मा. मुख्यमंत्रयांनी, उपोषण स्थळी जरांगे पाटलाची भेट घेऊन चर्चा केली. मंत्री मंडळाची उपसमिती स्थापण करून कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय झाला त्या प्रमाणे कुणबी प्रमाणपत्र वितरीत केली गेली. त्यापैकी काही प्रमाणपत्र बोगस आहेत असे म्हणणे पुर्णतः चुकीचे आहे, सर्व अटी आणि शर्थीची पूर्तता करणारांनाच कुणबी प्रमाणपत्र दिली गेली आहेत. माझ्या स्वतःच्या गावात कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारे पुरावे न मिळाल्यामुळे एकही कुणबी प्रमाणपत्र दिले गेले नाही.

राज्य सरकारने मनोज जरांगे पाटलांना एक महिण्याच्या आत सग्या सोयऱ्या प्रश्नी निर्णय घेऊ असे आश्वासन दिलेले आहे. त्याची पूर्तता करणे ही जबाबदारी राज्य सरकारची आहे. मनोज जरांगे पाटलांनी संविधानाच्या मार्गाने आपले अंदोलन केलेले आहे. अंदोलन कसे करावे हा आदर्श वस्तुपाठच त्यांनी देशा समोर ठेवलेला आहे. आजही ते आपल्या भुमिकेवर ठाम आहेत. राज्य सरकारने बनवाबनवी करने सोडून द्यावे. समाजा-समाजामध्ये फुट पाडा आणि राज्य करा हे धोरण राबवणे बंद करावे, किमान मा. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी तरी या धोरणाला मुठमाती देऊन दिलेले वचन पूर्ण करावे. संपूर्ण महाराष्ट्र, घडणाऱ्या घडामोडी उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. पडद्या मागचे सुत्रधार कोण आहेत हे महाराष्ट्र ओळखुन आहे.मा. मनोज जरांगे पाटलांची भूमिका रास्त आहे. तीचे समर्थन माझे मित्रमंडळ करत आहे.

# ग्रामीण भागातील लग्न समारंभातील चुलीवरचे जेवण झाले कालबाह्य





### ग्रामीण भागातील पंगत परंपरा बफे सिस्टीममुळे लोप पावतेय

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

तालुक्यात ग्रामीण भागामध्ये विविध कार्यक्रम,लग्न समारंभात भोजनाचा स्वाद म्हटल की,पोळी, वांगे,मसालेदार भाजी,भात असा विविध चवदार पदार्थांची रेलचेल असे.पूर्वी हे पदार्थ चुलीवर मोठी भांडी ठेवून केले जात असे.मात्र आता ती प्रथा कालबाह्य होत चालली असून या चवदार भोजनाचा अस्वाद नागरिकांना घेत येत नाही.अशा अनेक परंपरा लोप पावत असून आता ग्रामीण भागातील चुलीवरील जेवणाची पद्धत ही काळाच्या ओघात कालबाह्य होताना दिसत आहे.

पुर्वी ग्रामीण भागामध्ये कोणताही कार्यक्रम, लग्न समारंभ असला की जेवन तयार करण्यासाठी जमिनीत ३ ते ४ फुट गोल खड्डे खोदुन चुलगंण तयार करायचे त्या चुलीवर तीन मोठी

भांडी ठेवल्या जात असे.त्यात एकामध्ये भात,दुसऱ्यामध्ये वरण तर तिसऱ्यामध्ये भाजी अशा प्रकारे स्वादिष्ट व रुचकर जेवण बनवले जात होते.लग्न किंवा कार्यक्रम संपल्यावर कार्यक्रमानिमित्त दिलेल्या मंडपामध्ये लांबच लांब पंगत बसून विविध वाढेकरु बसलेल्या पंगतीत भोजन वाढताना दिसत.तर,पंगतीमध्ये बसलेली मंडळी श्लोक म्हणून वाढेकरुनी वाढलेल्या भोजनाचा स्वाद घेण्यास सुरुवात करत असे.आता मात्र,त्याची जगा बफे सिस्टीमने घेतली असली तरी पंगतीच्या भोजनाचा स्वाद आठवणीत नक्कीच राहत होता.

### चुलीची जागा गॅसने घेतली

ग्रामीण भागातील चुलकांडावरील जेवण आता कालबाह्य होत चालले असून या चुलीचा जागा गॅस सिलिंडर, शेगडीने घेतली आहे.कमी कालावधीमध्ये झटपट स्वयंपाक तयार होण्यासाठी याचा उपयोग केला जाऊ लागला आहे. तर,पंगती न पडता बफे पद्धतीप्रमाणे जेवण वाढण्याचे पद्धत दिसत आहे.

### आग्रहच राहिला नाही

ग्रामीण भागामध्ये बफे पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून ग्रामीण भागात आजही विविध कार्यक्रमांमध्ये पंगतीमध्ये भोजन आस्वाद घेण्यास मिळत आहे. मात्र,चुलीवरील (चुल भट्टी) भोजनाचा आस्वाद आठवणीत नक्कीच राहणार आहे.सध्या परिस्थितीत मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ, वेळ खर्च होत असला तरी, पंगतीप्रमाणे आग्रहाने जेवण वाढणे आता बंद झाले आहे.



माजलगाव:- शहर तालुक्यातून महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार खा.बजरंग बाप्पा सोनवणे यांना प्रामाणिकपणे सहकार्य केल्याबद्दल दलित नेत्याचा सत्कार करताना भाई गंगाभीषण थावरे, पत्रकार महेंद्र मस्के व पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे

## पांडुरंग आवारे यांची आ.क्षीरसागर यांनी भेट घेऊन केली विचार पुस

बीड । प्रतिनिधी

शिवसंग्राम चे नेते पांडुरंग आवारे-पाटील यांचा काही दिवसापूर्वी बीड तालुक्यातील चौसाळा येथे अपघात झाला होता आज दि.२२ ज्यून २०२४ रोजी बीड विधान सभेचे आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांनी पांडुरंग आवारे-पाटील यांची मानेवाडीतील निवासस्थांनी सदिच्छा भेट घेऊन आस्तेवाईक पणे विचार पुस करून लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या



या प्रसंगी समवेत रा.बीड ता अध्यक्ष बाळासाहेब गोरे, पी वाय जोगदंड सर, श्रीमंत सोनवणे, बाळासाहेब राऊत, मानेवाडीचे मा सरपंच अनिल टाके, उपसरपंच स्वामी माने,ग्रा.प.सदस्य शिवाजी माने सर, ग्रा.प.सदस्य नवनाथ मोरे, समाज सेवक दिगांबर तात्या आवारे व मानेवाडीतील अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## प्रा.संगीता जाधव यांना राज्यस्तरीय अहिल्यादेवी होळकर आदर्श शिक्षिका पुरस्कार

**माजलगाव । प्रतिनिधी**

जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्था, अहिल्यानगर तसेच यशवंत सेना अहिल्यानगर यांच्यावतीने देण्यात येणारा अहिल्यादेवी होळकर आदर्श शिक्षिका पुरस्कार येथील प्रा .संगीता जाधव यांना यशवंत सेनेचे संस्थापक अध्यक्ष कांतीलाल जाडकर यांच्या हस्ते दि २२ जुन शनिवारी प्रदान करण्यात आला. यावेळी यशवंत सेनेचे सरसेनापती माधव गडदे, यशवंत सेनेचे जिल्हाध्यक्ष विजय तमनर, यशवंत सेनेच्या महिला प्रमुख ज्योती उनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा.संगीता जाधव या सुंदरराव सोळंके महाविद्यालयात हिंदी विषयाच्या प्राध्यापक असून प्रसिद्ध कवयित्री आहेत.



सामाजिक कार्यामध्ये त्यांचा नेहमी सहभाग असतो. त्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारिणी सदस्य देखील आहेत. याबद्दल त्यांचे मसापचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके, प्रा.स्नेहल पाठक, प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड,किशोर गुंजकर,बालासाहेब झोडगे,प्रा.डॉ.उमेश साडेगावकर,प्रा. हिरामण डावरे , डॉ.अंगद गायकवाड, पुरुषोत्तम जाधव, बालाजी बोडके शरद रांजवण,डॉ. योगिता होके पाटील,गौरी देशमुख, डॉ.प्रज्ञा जोशी यांनी अभिनंदन केले आहे.

## नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांच्या अनागोंदी कारभाराच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी -प्रमोद शिंदे

**बीड। प्रतिनिधी**

नगरपरिषदेतील बांधकाम विभागत व इतर सर्वच विभागात बोगस व बायपास बील काढून सबंधित विभागातील अधिकारी यांना टक्केवारी देऊन फक्त कागदावरच कामे दाखावून बील उचलले जात आहेत.

२) मागील वर्षातील उझाऊ, दलीत वस्तीतील मंजूर झालेली कामे न करताच फक्त कागदपत्री दाखवून बील उचलली आहेत मात्र हा सर्व प्रकार मुख्याधिकारी, बांधकाम उपअभियंता किरण देशमुख व पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता टाळके तसेच कन्ट्रक्शन यांच्या संगण मताने करून दलीत वस्तीतील कामे करण्यास जाणून-बुजून टाळाटाळ केली जाते.

३) नगरपरिषदेतील पाणी पुरवठा विभागाचे जबाबदार अधिकारी उपअभियंता टाळके साहेब हे पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी याच्या पगारी करत नसल्याने पाणी पुरवठा विभागाचे नियोजन पूर्ण पणे ढासळले असून शहरात महिन्याला एकदा पाणी सोडले जाते त्यामूळे शहरातील नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. तसेच शहरात घाणीचे साम्राज्य थयमान घालत असून शहरात ठिकठिकाणी कचरा आणि घाणीची दुर्गंधी पसरली आसून यामुळे शहरातील वयवृध्द व लहान मुलाना आजाराला सामोरे जावे लागत असल्याने शहरातील बाल रुग्णालय आणि खासगी दवाखाने मात्र गच्च भरले आहेत यासाठी नगरपरिषद मुख्याधिकारी व पाणीपुरवठा उपअभियंता टाळके तसेच बांधकाम अभियंता किरण देशमुख जबाबदार आहेत.याचे कारण हेच की नागरिक कोमात आणि अधिकारी जोमात अशी आहे.

तसेच नगरपरिषदेत टक्केवारी आणि काळा पैसा घेता येत नसल्यामुळे बांधकाम विभागचे उपअभियंता किरण देशमुख व पाणी पुरवठा विभागांचे उपअभियंता टाळके तसेच सर्वच विभागाचे अधिकारी हे खासगी ऑफिस टाकून तेथून नगरपरिषदेचा कारभार पाहतात जेणे करून टक्केवारी घेता येईल आणि काळा पैसा जमा करता येईल. तरी मा. जिल्हाधिकारी साहेब यांना विनंती कारण्यात येते की, १५ दिवसाच्या आत आमच्या तक्रारीची दखल घेण्यात यावी अन्यथा विभागीय



आयुक्त कार्यालय संभाजीनगर येथे ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. या वेळी अनिल निसर्गण,नितीन मुजमुले,हर्षद वडमारे व इतर

## बीड नगर परिषद हे मुख्याधिकाऱ्यांचे माहेर आहे का? म्हणून बीडमधील नाल्यांची सहा महिन्यांपासून स्वच्छता नाही

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील अनेक भागांमध्ये सध्या प्रचंड दुर्गंधी दिसून येत आहे. गत मागील ६ महिन्यापासून शहरातील जालना रोड, नगर रोड, कॅनल रोड, डी पी रोड, सुभाष रोड, टिळक रोड, माळवेस, बारादरी, रलाल चौक, जुनी भाजी मंडई, शहरातील अनेक गल्ल्या डोळ्यातील आणि विभागातील नाल्यांची साफ सफाई केलेली नाही, त्यामुळे दुर्गंधी प्रचंड वाढली आहे आरोग्यास धोकादायक ठरू लागले आहे. तसेच रस्त्यांवर स्वच्छता दिसत नाही. प्रचंड धुळीचा सामना नागरिकांना करावा लागतो आहे. याकडे नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे आणि त्यांच्या स्वच्छता विभागातील कर्मचार्यांना वेळ दिसत नाही. दरम्यान आगामी पावसात तुंबलेल्या नाल्यांमुळे पावसाचे पाणी व्यापार्यांच्या दुकानात शिरले तसेच

### पावसाळ्यात व्यापाऱ्यांच्या दुकानात पाणी शिरल्यास मुख्याधिकारी जबाबदार-ललित अब्बड

### पंधरा दिवसात स्वच्छता मोहिम पूर्ण न झाल्यास याचिका दाखल करण्याचाही इशारा

बिंदूसरा नदीपात्रात स्वच्छता न झाल्याने तेथे पुरस्थिती उद्भवल्यास व्यापार्यांचे नुकसान झाल्यास त्यास नगरपालिका प्रशासन अन् जबाबदार असेल. तसेच येत्या पंधरा दिवसात नाल्यांची सफाई करुन स्वच्छता मोहिम न राबवल्यास न्यायालयात जनहित याचिका दाखल करु असा इशारा सामाजिक कार्यकर्ते ललित अब्बड यांनी दिला आहे.

याबाबत त्यांनी दिलेल्या निवेदनात शहरातील बकालवस्थेचा मुद्दा अधोरेखित केला आहे. नगरपालिकेकडून अनेक भागातील नाल्यांची सफाई केली जात नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे असे सागंत अब्बड यांनी पुढे म्हटले आहे की, बिंदुसरा नदी पात्रात कचरा फेकून दिला जातो, त्यामुळे नदीपात्रात प्रचंड प्रदूषण झाले असून हाच कचरा पुन्हा नदीपात्रात वाहत जात असल्याने नदीपात्रात कचरा मोठ्या प्रमाणात विखुरला जात आहे. नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे व त्यांची स्वच्छता विभागाची टीम याकडे पुरते दुर्लक्ष करत आहे. त्यांना कसलेही देणे घेणे राहिलेले नाही.

सर्वसामान्यांचे आरोग्य मात्र यामुळे धोक्यात सापडले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार आंदोलने आणि निवेदने देऊनही नगरपालिका प्रशासनाने शहर स्वच्छतेच्या प्रश्नाकडे कायमच दुर्लक्ष केले आहे असा आरोपही अब्बड यांनी केला आहे. आता पावसाळा सुरू होत आहे त्यामुळे शहरातील सर्वच भागातील नाल्यांची दुरुस्ती करणे अतिशय महत्त्वाचे आहे; कारण नाल्यातील कचरा बाहेर काढला नाही तर पावसाच्या पाण्याने तोच कचरा रस्त्यावर आणि दुकानांमध्ये विखुरला जातो. नगरपालिका नावाची कसलीही व्यवस्था सध्या बीड शहरात अस्तित्वात राहिलेली नाही. बीडमध्ये यापूर्वी पुराचा धोका सर्वांनी अनुभवलेला आहे. आगामी काळातही मोठा पाऊस झाला तर नदीपात्रातील कचर्यामुळे शहरात प्रवाह जाईल तिकडे पुराचे पाणी येऊ शकते त्यामुळे पात्र स्वच्छ आणि खोलीकरण करणे आवश्यक आहे; परंतु याकडेही पालिका प्रशासन आणि स्वच्छता विभागाचे दुर्लक्ष दिसत आहे. शहरातील प्रेस लाईन परिसरात कचरा आणून फेकून दिला जातो आणि हाच कचरा नंतर जनावरे अस्ताव्यस्त करून पसरवतात. या ठिकाणी लोखंडी कचरा संकलित करण्याची लोखंडी कुंडी ठेवण्यात आली आहे परंतु अनेकदा या कुंडीमध्ये जमा झालेला कचरा कुंडीमध्येच जाळून टाकला जातो त्यामुळे ती कचराकुंडी अक्षरशः वितळून गेली असून त्याचा पत्राही जळाला आहे, अशी एकंदर बिकट स्थिती आहे असा आरोप सामाजिक कार्यकर्ते ललित अब्बड यांनी केला आहे. पालिका प्रशासनाने आपला कारभार सुधारला नाही तर लवकरच न्यायालयात जनहित याचिका दाखल करु असा इशारा त्यांनी दिला आहे.

पान ६ वरून...

### प्रसिद्ध व्यापारी मनोज

मनोज अग्रवाल यांनी तर अक्षरशः शून्यातून विश्व निर्माण केले आहे. आजघडीला मनोज अग्रवाल हे फक्त बीड शहरातच नाही तर संपूर्ण बीड

जिल्ह्यात एक सुहृदयी व्यक्तीमत्व यशस्वी व सुप्रसिद्ध व्यापारी म्हणून ओळखले जातात. आपल्या आई-वडिलांसारखेच तेही सर्वसामान्य गोरगरिबांच्या अडीअडचणीत धावून जातात. असे हे मनोज अग्रवाल आणि त्यांचे सर्व बंधू आता आईच्या मायेला पारखे झाले आहेत. गीतादेवी यांच्या पार्थिवावर रविवार दिनांक २३ जून २०२४ रोजी सकाळी १०:०० वाजता मोंढा रोडवरील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. गीतादेवी यांच्या मागे पती गणपतलालजी अग्रवाल, एक मुलगी, प्रमोद, अजय, विजय आणि मनोज ही चार मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### नाहक खर्च टाळून

चि. रितेश हनुमंत शेंडगे, चि.आदित्य गोविंद घोरपडे, चि.माऊली अनिल खरात चि. रितेश विकास भोसले या सर्वं गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी गावातील प्रतिष्ठित अशोक स्वामी, विष्णू यादव, भगवान घोरपडे, सरपंच बलभीम कापसे, ग्रा.पं. सदस्य शंकर मगर, सोसायटी संचालक भागवत चिलवंत आदि जन उपस्थित होते. सामाजिक उपक्रम राबवत अनोख्या पद्धतीने वाढदिवस साजरा केल्याने त्यांच्यावर कौतुकांचा, शुभेच्छांचा वर्षाव होत होता.

### गुणवंत विद्यार्थी घडवणारी

गोरगरीब विद्यार्थ्यांची शिक्षणाची प्रमुख सोय झाली असून.विद्यार्थी चांगल्या प्रकारे जीवनात घडत आहेत. याचे श्रेय जाते श्री तिरुपती शिक्षण संस्थेला तसेच दुसरे प्रमुख पाहुणे राजेंद्रजी जगताप साहेब म्हणाले की.जीवनात जर यशस्वी व्हायचे असेल तर आपल्याला ज्ञानाशिवाय पर्याय नाही.विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनामध्ये वाचन खूप मोठ्या प्रमाणात केले पाहिजे याचा नक्कीच फायदा भावी आयुष्यात होतो.कार्यक्रमाचे संचलन.महादेव ठोंबरे.तर आभार प्रदर्शन.अक्षय सिरसट यांनी केली.कार्यक्रमाला विद्यार्थी पालक शिक्षक.इतर कर्मचारी व्यंकटेश परिवारातील तसेच उत्कर्ष परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

### वैष्णवीच्या शिक्षणास

कुटुंबीयांच्या चेहऱ्या वरील आनंद खूप काही सांगून जात होता. ... वैष्णवीने परिस्थितीवर मात करून मिळवलेले यश हे निश्चितच उल्लेखनीय आहे, आधार माणुसकीचा उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील सामान्य कुटुंबातील गुणवंत गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी देणगीदार व ठाणे येथील संस्थेच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ व योग्य मार्गदर्शन करण्याचे कार्य संस्थेच्या माध्यमातून सुरू आहे, आधार माणुसकीचा उपक्रमाच्या माध्यमातून बीडलातूर जिल्ह्यातील वंचीत कुटुंबातील ७०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक पाठबळ देण्यात येत आहे,७५ विद्यार्थी महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत , अशी माहिती अॅड संतोष पवार यांनी व्यक्त केली.

## पंकजा मुंडेंचं राजकीय पुनर्वसन होईपर्यंत भाजपला मतदान नाही; बीडमधील गावाचा निर्धार

बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत बीड मतदारसंघात पंकजा मुंडे यांचा पराभव झाल्यानंतर जिल्ह्यासह समर्थकांमध्ये नाराजीची लाट होती. काही समर्थांनी नैराश्येतून टोकाचे निर्णय देखील घेतले. यानंतर पंकजा मुंडे यांना राज्यसभेवर घ्या, असे माजी आमदार सुरेश धस म्हणाले होते. दरम्यान आता पंकजा मुंडे समर्थकांनी केलेल्या मागणीमुळे भाजपच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

बीड जिल्ह्यातील मुंडे समर्थकांनी पंकजा मुंडे यांचे तात्काळ राजकीय पुनर्वसन करावे अशी मागणी केली आहे. बीड तालूक्यातील सानपवाडीचे ग्रामस्थ यासाठी आक्रमक झाले आहेत. विधानसभेपूर्वी याबाबतचा निर्णय झाला नाही, तर भाजपला मतदान करणार नाही, असा पवित्राच या ग्रामस्थांनी घेतला.




यासंदर्भात एक बैठक देखील झाली असून या बैठकीत हा ठराव घेण्यात आला. आता यावर भाजप काय निर्णय घेते आणि पंकजा मुंडे यांना कशा पद्धतीने संधी मिळते याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे. अशा पद्धतीचा निर्णय न झाल्यास भाजपला काही मतदारसंघांमध्ये पंकजा मुंडे यांच्या समर्थकांच्या या पद्धतीच्या रोशाला सामोरे जावे लागणार आहे.

## सात गाव दोन दिवसापासून अंधारात-राजेंद्र आमटे

## महावितरणचा भोगळ कारभार

**बीड । प्रतिनिधी**

खांडे पारगाव परिसरातील खांडे पारगाव, अंथरवान प्रिंप्रि , नागपूर खुर्द, उमरी, अंथरवण प्रींप्री तांडा, नागपूर बुद्रुक, उमरद खालसा हि सात गाव दोन दिवसापासून अंधारात आहेत. महावितरणचा भोगाळ कारभारामुळे सातगावामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जनावरांचे पाण्यासाठी टँकर विकत घ्यावे लागत आहे. गिरणी बंद असल्यामुळे दळनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. महावितरण ने तत्काळ कारवाई करून सात गावामधील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा अन्यथा सात गावामधील नागरिक महावितरण च्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, जालिंदर सोळुंके, सुभाष गिरम,राम सोळुंके, सुरेश खुरणे, श्रीराम खुराने, सचिन आमटे, महादेव आमटे, विक्रम शिंदे, रमेश शिंदे, रामभाऊ पवार, रमेश पवार, यांच्या वतीने मागणी करण्यात येते.



cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.२४ जून २०२४
४

# पेरणीवेळीच झाली डीएपीची टंचाई

## पर्यायी खतांचा वापर करा, कृषी विभागाने दिला सल्ला

पुणे : राज्याच्या काही भागांत ऐन खरिपात डीएपीची टंचाई निर्माण झाली आहे. रासायनिक खत निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचे पुरवठा नियोजन विस्कळीत झाल्यामुळे टंचाई तयार झाली आहे. त्यामुळे कृषी खात्याने धावपळ करीत संरक्षित साठे खुले केले आहेत. शेतकऱ्यांनी आता डीएपीला पर्यायी ठरणाऱ्या खतांचा वापर करावा, असा सल्ला कृषी खात्याने दिला आहे.

प्रभारी कृषी आयुक्त रावसाहेब भागडे तसेच कृषी निविष्ठा व गुणनियंत्रण विभागाचे संचालक विकास पाटील सध्या खतपुरवठ्याचा सातत्याने आढावा घेत आहेत. हेतुतः टंचाई किंवा काळाबाजार होत असल्याचे निष्पन्न होत असल्यास कडक कारवाईचे आदेश कृषी आयुक्तालयाने दिले आहेत. सुत्रांच्या म्हणण्यानुसार, राज्यभरातील डीएपीची उपलब्धता पाहिल्यास दीड लाख टनांपेक्षा जास्त डीएपी विविध जिल्ह्यांमध्ये उपलब्ध आहे. परंतु तालुकानिहाय व गावपातळीवरील उपलब्धता विचारात घेतल्यास काही जिल्ह्यांमध्ये मागणीच्या प्रमाणात डीएपी उपलब्ध नाही. त्यामुळे टंचाईची स्थिती राज्यभर नसून चार, पाच जिल्ह्यांमधील निवडक भागातून तक्रारी येत आहेत. दरम्यान, टंचाईच्या कारणाबाबत कृषी आयुक्तालयाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले, की राज्यासाठी पाच लाख टन डीएपी पुरवण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. हा पुरवठा विविध कंपन्यांमध्ये दिला जातो. वितरकांचे जाळे व जिल्ह्यांमधील खपाचा पूर्वेतिहास तपासून प्रत्येक कंपनीकडून डीएपी पुरवठ्याचे नियोजन केले जाते. हे नियोजन कृषी विभागाला कळविले जाते. परंतु ऐनवेळी काही समस्या उद्‌भवल्यास नियोजन विस्कळीत



होते व त्याचा परिणाम खत पुरवठ्यावर होत टंचाईची स्थिती तयार होते.

गुणनियंत्रण विभागाने घेतलेल्या ताज्या आढाव्यानुसार, राज्यात एक एप्रिल रोजी दीड लाख टन डीएपीचा मागील हंगामातील साठा शिल्लक होता. हा साठा शिल्लक असताना आतापर्यंत नव्याने दीड लाख टनाचा पुरवठा झालेला आहे. त्यामुळे आतापर्यंत तीन लाख टनांहून जास्त डीएपी राज्यभर उपलब्ध आहे. जिल्हानिहाय स्थिती बघता एकूण साठ्यापैकी शेतकऱ्यांनी आतापर्यंत दीड लाख लाख टन डीएपीची खरेदी केलेली आहे. अजूनही राज्यात एक लाख ६० हजार टन डीएपी शिल्लक आहे. परंतु मृगाचा पाऊस यंदा चांगला बरसल्यामुळे काही भागांमधून डीएपीच्या मागणीत एकदम वाढ झाली व त्यातून टंचाईची स्थिती तयार झाली.

सध्या तीन कंपन्यांनी नियोजनानुसार डीएपीचा पुरवठा केलेला नाही. त्यात पूर्णतः कंपन्यांची देखील चूक नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या मालाचे वाढलेले दर, कच्चा माल मिळण्यात तयार झालेले अडथळे, रेल्वे वाघिणींची उपलब्धता, सोयाबीन उत्पादक पट्ट्यातून अचानक वाढलेली मागणी या कारणांमुळे कंपन्यांच्या डीएपीच्या पुरवठ्याला अडथळे येत आहेत. ही स्थिती पूर्वपदावर येईल. परंतु त्याआधी शेतकऱ्यांनी डीएपीसाठी ताटकळत न बसता पर्यायी खतांची खरेदी करायला हवी.

संरक्षित साठे खुले करण्याचे आदेश

टंचाईची स्थिती पाहून कृषी विभागाने आता डीएपीचे संरक्षित साठे खुले करण्याचे आदेश दिले आहेत. ''राज्यात यंदा २५ हजार टन डीएपीचा संरक्षित साठा तयार करण्याचे नियोजन केले होते. त्यापैकी १५ हजार ५९२ टन साठा तयार केला आहे. या साठ्यातून आतापर्यंत एक हजार २१३ टन डीएपीचे वितरण केले आहे,'' अशी माहिती समोर आली आहे.

इतर खतांचा वापर करा : दरम्यान, कृषी संचालक विकास पाटील यांनी राज्यातील शेतकऱ्यांनी डीएपीवर अवलंबून न राहण्याऐवजी पर्यायी खतांचा वापर वाढवायला हवा, असा सल्ला दिला आहे. डीएपीमध्ये १८ टक्के नत्र व ४६ टक्के स्फुरद आहे. शेतकऱ्यांनी डीएपीच्या एका गोणीला पर्याय म्हणून युरियाची अर्धी गोणी व 'एसएसपी'च्या तीन गोण्यांचा वापर करावा. एसएसपीमध्ये स्फुरद १६ टक्के असून, गंधक व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आहेत. त्यामुळे सोयाबीनसारख्या तेलबिया पिकांसाठी एसएसपी उपयुक्त आहे, असे पाटील यांचे म्हणणे आहे.

संयुक्त खते मुबलक प्रणामात : राज्यात डीएपीची टंचाई भासत असली तरी संयुक्त खते मुबलक उपलब्ध आहेत. एनपीके १०.२६.२६, एनपीके २०.२०.०१३ एनपीके १२.३२.१६, एनपीके १५.१५.१५ या संयुक्त खतांचा वापर डीएपीला पर्यायी ठरतो. या खतांमध्ये नत्र, स्फुरदाबरोबरच पिकांना पालाशदेखील मिळते. याशिवाय शेतकऱ्यांनी डीएपीला पर्याय म्हणून टीएसपी खत वापरावे. त्यात ४६ टक्के स्फुरद आहे. त्यामुळे डीएपीच्या एका खताच्या गोणीऐवजी युरियाची अर्धा गोणी व टीएसपीची एक गोणी वापरणे अत्यंत उपयुक्त ठरेल, असा सल्ला कृषी आयुक्तालयाने दिला आहे.

# अपयश आले म्हणून खचून जाणारा मी नाही

## शेतकऱ्यांसाठी काम करत राहणार : शेट्टी

बारामती

काहीच दिवसांपूर्वी लोकसभा निवडणुकीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांचा दारूण पराभव झाला. त्यानंतर शेट्टी पुन्हा एकदा कामाला लागले आहे. यावेळी त्यांनी, निवडणुकीत अपयश आले म्हणून काय झालं. मी खचून जाणार नाही. शेतकऱ्यांसाठी काम करत राहणार असल्याचे म्हटले आहे. बारामतीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत शनिवारी (ता.२२) शेट्टी बोलत होते.

यावेळी सतीश काकडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी स्वाभिमानीचे प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप व जालंदर पाटील, डॉ. प्रकाश पोपळे, सतीश काकडे, सावकर मादनाईक, घनशाम चौधरी, गजानन बांगळे पाटील, राजेंद्र ढवाण पाटील, प्रकाश बालवडकर, अमर कदम, दामू इंगोले, प्रशांत डिक्कर, अनिल पवार, प्रभाकर बांगर आदी उपस्थित होते. बारामती येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या दोन दिवसीय बैठकीस शनिवारपासून सुरूवात झाली. यावेळी शेट्टी म्हणाले, शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी आपण कायम काम करत आलो असून पुढे काम करणार आहोत. यापुढे देखील शेतकरी व कष्टकऱ्यांसाठी सावलीसारखा उभा राहीन. निवडणूक लढविणे हा अंतिम उद्देश नसून आपण कुठे चुकलो याचा विचार आता करायचा आहे. तर पुढील राजकीय दिशा निश्चित करायची असल्याचेही शेट्टी यांनी नमूद केले. यावेळ शेट्टी म्हणाले, केंद्र व राज्याच्या चुकीच्या धोरणांमुळेच आज शेतकरी संकटात सापडला आहे. शेतकऱ्याला दिवसा वीज मिळायला हवी. मात्र सरकार गंभीर नाही. धरण, जमीन व पाणी शेतकऱ्याचे असूनही त्यालाच वीजच मिळत नाही. उसाच्या एफआरपीचा कायदा मोडीत काढण्याचे मोठे पाप महाविकास आघाडीने केले. त्याच्या या पापामुळेच आज हजारो कोटींची एफआरपीची रक्कम थकली आहे. सोयाबिन, शेतीमाल, कांदा, दुधाला भाव नाही. शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर झालाय. मुला-बाळांची लग्न जमेनात. तर विकासाच्या नावाखाली शेतजमिनींचे अधिग्रहण केले जात आहे. उद्योगपतींना सवलती दिल्या जातात. यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तोडगा काढण्याच्या उद्देशाने, तसेच आगामी विधानसभा निवडणुकीची रणनीती निश्चित करण्यासाठी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मंथन केले.

# पेरणीपूर्वी करा बियाणे उगवणक्षमता तपासणी

शेतकऱ्यांना हंगाम सुरू होतेवेळी बियाण्यांची उपलब्धता, बियाण्यांची शुद्धता, भेसळ, उगवणक्षमता अशा बियाण्यांशी निगडित अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. जर घरचे किंवा अन्य शेतकऱ्यांचे बियाणे वापरणार असेल, तर त्याची उगवणक्षमता तपासून घेणे गरजेचे असते, अन्यथा दुबार पेरणीसारख्या संकटालाही सामोरे जावे लागू शकते. पेरणीपूर्व जर बियाण्याची उगवणक्षमता तपासली तर अशा गोष्टी टाळता येऊ शकतात.

उगवणक्षमता कशी तपासावी? : उगवणक्षमता तपासणीसाठी बियाण्यांतून त्या संपूर्ण बियाण्यांचा प्रातिनिधिक स्वरूपाचा नमुना काढावा. त्याकरिता प्रत्येक पोत्यामधून खोलवर हात घालून मूठभर बियाणे काढावे. सर्व पोत्यांतील काढलेले बियाणे व्यवस्थित एकत्र करावे. त्यातून प्रातिनिधिक नमुना घ्यावा. या नमुन्यातून तपासणीकरिता ४०० दाणे न निवडता सरसकट घ्यावेत. १०० -१०० दाण्यांचा एक याप्रमाणे ४ भाग करावेत. अचूक उगवणक्षमतेसाठी जास्त दाणे घेणे कधीही चांगले.पेरणीची हंगाम सुरू असताना शेतकऱ्यांना प्रत्येकवेळी प्रयोगशाळेत जाऊन उगवणक्षमता तपासणी करणे शक्य नसते. अशा घरगुती साधनांतून उगवणक्षमता तपासणीच्या काही सोप्या पद्धती वापरता येतात.

घरगुती पद्धती : कागदामध्ये बियाणे घेऊन उगवणक्षमता तपासणी : उगवणक्षमता तपासणीचे दोन कागद ओले करून घ्यावे. ओल्या केलेल्या दोन



कागदांच्या मध्ये १०० बिया १० ओळींत समान अंतरावर ठेवून घ्याव्यात. कागदाची गोल गुंडाळी करून घ्यावी. दोन्ही बाजूंनी रबर लावावे. प्रत्येकी १०० बिया या प्रमाणे कागदाच्या ४ गुंडाळ्या करून घ्याव्यात. त्यातील ओलावा टिकून राहील, याची काळजी घ्यावी.

रेती/ मातीमध्ये उगवणक्षमता तपासणी : ४ कुंड्यांमध्ये किंवा प्लॅस्टिक ट्रेमध्ये बारीक रेती किंवा ज्या शेतात पेरणी करावयाची आहे तेथील माती भरावी. त्यास हलके पाणी द्यावे. दुसऱ्या दिवशी चारही कुंड्यांमध्ये किंवा ट्रेमध्ये प्रत्येकी १०० बिया १ ते २ सें. मी. खोलीवर लावाव्यात. मातीतील किंवा रेतीतील ओलावा टिकून ठेवावा. परंतु जास्त पाणी होणार नाही याची काळजीही घ्यावी. गोणपाटाच्या तुकड्याचाही वापर उगवणक्षमता तपासणीसाठी करता येतो. त्याकरिता आयताकृती आकाराचा साधारणतः १ फूट १.५ फूट आकाराचा गोणपाटाचा तुकडा घेऊन तो ओला करून घ्यावा. त्यावर १०० बिया १० ओळींत समान अंतरावर ठेवाव्यात. बियाण्यासहित गोणपाटाची गुंडाळी करून घ्यावी. अशा ४ गोणपाटांच्या गुंडाळ्या करून घ्याव्यात. ओलावा टिकवून ठेवावा, परंतु जास्त पाणी होणार नाही याची काळजी घ्यावी. वरील पैकी कोणतीही पद्धत वापरली तरी साधारणतः ८ ते १० दिवसांत बियाण्यांची उगवण होते. आपण ठेवलेल्या बियाण्यांपैकी कितीला कोंब निघाले आहेत, हे मोजावेत. विकृत रोपे, सडलेले बी, कठीण व टणक बी मोजणीत घेऊ नये. चारही नमुन्यांची सरासरी काढून उगवणक्षमतेची टक्केवारी काढावी. ही टक्केवारी आपल्याला सरासरी उगवणक्षमतेचा अंदाज देते.बियाण्याची उगवणक्षमता प्रमाणित केलेल्या उगवणक्षमतेपेक्षा अधिक असेल तर ते बियाणे पेरणीस योग्य असते. प्रमाणित उगवणक्षमतेपेक्षा ५-८ टक्के उगवणक्षमता कमी असल्यास एकरी बियाण्यात १० टक्क्यांनी वाढ करावी. परंतु उगवणक्षमता फारच कमी असल्यास तर असे बियाणे पेरणीसाठी वापरू नये.

# शंखी गोगलगायीचे असे करा एकात्मिक नियंत्रण!

खरीप हंगामात पिकांची पेरणी झाल्यावर बऱ्याच ठिकाणी सोयाबीन, कापूस, भाजीपाला व विविध फळबागेमध्ये शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. सोयाबीन, कापूस यासारख्या पिकामध्ये रोप अवस्थेतच गोगलगायीचा प्रादुर्भाव होत असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते, त्यामुळे शेतकर्यांनी या गोगलगायींना वेळीच ओळखून उपाय योजना करणे जरुरीचे आहे.

शंखी गोगलगाय ही कीड निशाचर आहे. पीक रोपावस्थेत असताना रात्रीच्या वेळी ही कीड पानासहीत पूर्ण रोप खाऊन टाकते. यामुळे पिकांचे खुप नुकसान होते. त्यामुळे गोगलगायीचा प्रादुर्भाव वेळीच ओळखून त्याचे एकात्मिक व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे.

शंखी गोगलगायीचे एकात्मिक व्यवस्थापन :

शेताचे बांध स्वच्छ ठेवावे, त्यामुळे गोगलगायींना लपण्यास जागा राहणार नाही. सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बुडवून माराव्यात. शेतातून मोठ्या शंखी गोगलगायी जमा करून प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे, जेणेकरून त्यामधील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किंवा चुन्याच्या संपर्कात येऊन आत मध्येच मरून जातील. शेतामध्ये किंवा बागेमध्ये ७ ते ८ मीटर अंतरावर विविध ठिकाणी वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकांच्या अवशेषाचे



ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात ठिकठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावी. लहान शंखीसाठी मिठाची फवारणी किंवा कॅल्शियम क्लोराईडचासुद्धा नियंत्रणासाठी बर्याच ठिकाणी वापर केला जातो. शेत किंवा बागेच्या सभोवती बांधापासून आत तंबाखू भुकटीचा अथवा चुन्याचा ५ सें.मी. रुंदीचा पट्टा गोगलगायींना शेतात जाण्यास प्रतिबंध म्हणून व नियंत्रणासाठी टाकावा. फळबागेमध्ये झाडाच्या खोडास १०% बोर्डोपेस्ट लावल्यास गोगलगायी झाडावर चढत नाही. गोगलगायीच्या नियंत्रणासाठी मेटाल्डिहाईड दाणेदार या गोगलगाय नाशकाचा वापर करावा. सोयाबीन व कापूस यासारख्या पिकामध्ये दाणेदार मेटाल्डिहाईड (स्नेलकिल) दोन किलो प्रति एकरी या प्रमाणात शेतात पसरून द्यावे. तर फळबागेमध्ये झाडाखाली दाणेदार मेटाल्डिहाईड (स्नेलकिल) प्रति झाड १०० ग्रॅम पसरून टाकावे.

शंखी गोगलगाय प्रामुख्याने पपईची रोपे व झेंडूच्या रोपांकडे आकर्षित होतात. म्हणून मेटाल्डिहाईडच्या (स्नेलकिल) गोळ्या पपईच्या पिवळ्या पानांजवळ ठेवतात. त्यामुळे त्या लवकर आकर्षित होऊन मोठ्या प्रमाणात मरतात. जर हे आमिष उपलब्ध न झाल्यास, पुढील प्रकारे आमिष तयार करून बागेमध्ये टाकून घ्यावे. दहा लिटर पाण्यामध्ये २ किलो गूळ अधिक २५ ग्रॅम यीस्ट यांचे द्रावण तयार करावे. हे द्रावण ५० किलो गव्हाच्या अथवा भाताच्या कोंड्यात टाकून चांगले मिसळावे. १० ते १२ तास हे मिश्रण आंबवण्यासाठी ठेवावे. त्यानंतर त्यामध्ये थायामिथोक्झाम ५० ग्रॅम चांगल्या प्रकारे मिसळावे. हे आमिष शेतामध्ये ढिगाच्या स्वरुपात किंवा बांधाच्या कडेने पट्टा स्वरुपात टाकावे. सदरील आमिषा पासून पाळीव प्राणी, लहान मुलांना दूर ठेवावे.

वरील गोगलगायनाशक अथवा अमिषाचा वापर प्लॅस्टिक हातमोजे घालूनच काळजीपूर्वक करावा. अशाप्रकारे शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव ज्या भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत असेल त्या भागातील शेतकर्यांनी एकत्र येऊन सामूहिक रित्या वरील प्रमाणे उपाय योजना केल्यास गोगलगायीचे नियंत्रण लवकरात लवकर व अधिक प्रभावीपणे होते.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१२६० : दिल्ली येथील सल्तनत साम्राज्याचे पहिले सुलतान कुतुबुद्दीन ऐबक यांचा तत्कालीन भारतातील लाहोर या प्रांतात राज्याभिषेक करण्यात आला.
१४४१ : इटन कॉलेजची स्थापना.
१५७१ : मिगेल लोपेझ दि लेगाझ्पीने मनिला शहराची स्थापना केली.
१७९३ : फ्रान्समधील पपहिल्या प्रजासत्ताक घटनेचा अवलंब केला गेला.
१८८० : ओ कॅनडाचे हे गाणे कॅनडाचे राष्ट्रगीत म्हणून पहिल्यांदा गायले गेले.
१९३९ : सयामचे थायलँड असे नामकरण करण्यात आले.
१९४० : दुसरे महायुद्ध फ्रान्स व इटलीमधे शस्त्रसंधी झाली.
१९६१ : भारतात निर्मित स्वदेशी एच. एफ २४ सुपर सोनिक लढाऊ विमानाणे भरारी घेतली.
१९६६ : मुंबईहून न्यूयॉर्कला जाणाऱ्या एयर इंडियाच्या विमान स्वित्झर्लंड देशांतील माउंट ब्लांकमध्ये दुर्घटनाग्रस्त झाल्यामुळे ११७ नागरिक ठार झाले.
१९८२ : कर्नाटकातील सर्व शाळांत कन्नड भाषा शिकविण्याची सक्ती करण्यात आली.
१९९६ : मायकेल जॉन्सनचा १९.६६ सेकंदांत २०० मीटर धावून विश्वविक्रम.
१९९८ : अभिनेते चंद्रकांत मांडरे यांना अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचा 'चित्रभूषण पुरस्कार' जाहीर
२००१ : 'आय. एन. एस. विराट' ही भारतीय नौदलाची एकमेव विमानवाहू नौका आधुनिकीकरणानंतर पुन्हा नौदलात दाखल झाली.
२००४ : न्यू यॉर्क राज्यात मृत्युदंड असंवैधानिक ठरवण्यात आला.
२०१० : जुलिया गिलार्ड यांनी ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६३ : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन इतिहासाचार्य इतिहासकार, अभ्यासक, लेखक, भाष्यकार आणि वक्ते विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा जन्मदिन.
१८६२ : रविकिरण मंडळाचे संस्थापक श्रीधर बाळकृष्ण रानडे यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च १९७४)
१८६९ : दामोदर हरी चाफेकर चार्ल्स रँड याची हत्या करणारे (मृत्यू: १८ एप्रिल १८९८)
१८९२ : श्रीधर बाळकृष्ण रानडे रविकिरण मंडळाचे संस्थापक (मृत्यू: २१ मार्च १९७४)
१८९७ : पण्डित ओंकारनाथ ठाकूर ऊर्फ 'प्रणव रंग' गायक व संगीत अभ्यासक, १९५५ मधे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित (मृत्यू: २९ डिसेंबर १९६७)
१८९३ : द वॉल्ट डिस्नी कंपनी चे सह-संस्थापक रॉय ओ. डिस्नी यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर १९७१)
१८९९ : मर्दानी रुप, तिन्ही सप्तकांतुन सहजपणे फिरणारा आवाज या देणग्या लाभलेले व गंधर्वयुगाची स्मृती जागवणारे नटवर्य गोपाळ गोविंद ऊर्फ नानासाहेब फाटक यांचा जन्म (मृत्यू: ८ एप्रिल १९७४)
१९०८ : गुरू गोपीनाथ कथकली नर्तक (मृत्यू: ९ आक्टोबर १९८७)
१९२७ : तामिळ लेखक कवियरासू कन्नडासन यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९८१)
१९२८ : मृणाल गोरे समाजवादी नेत्या आणि ६ व्या लोकसभेच्या सदस्य (मृत्यू: १७ जुलै २०१२)
१९३७ : ज्येष्ठ लेखिका अनिता मुजूमदार देसाई यांचा मसुरी येथे जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५४ : भारतीय इतिहास कालखंडातील प्रसिद्ध वीरांगना गोंडवाना राज्याच्या राज्यकर्त्या राणी दुर्गावती यांचे निधन.
१८८१ : हिंदू मठाधिपती, समाजसुधारक व लेखक तसचं, आधुनिक पंजाबी गद्याचे जनक पंडित श्रद्धाराम शर्मा यांचे निधन.
१९०८ : अमेरिकन राजकारणी व अमेरिकेचे माजी अध्यक्ष स्टीफन ग्रोव्हर क्लेव्हलँड यांचे निधन. अमेरिकन इतिहासातील एकमेव राष्ट्रपती होते ज्यांनी राष्ट्रपती पदाचा सलग दोनवेळा कारभार सांभाळला.
१९१४ : वासुदेव गणेश टेंबे उर्फ टेंबे स्वामी किंवा वासुदेवानंद सरस्वती यांचा गरुडेश्वर, बडोदा, गुजरात येथे निधन. (तारखेप्रमाणे)
१९४७ : बौद्ध धर्माचे अभ्यासक पंडित धर्मानंद कोसंबी यांचे निधन. (जन्म: ९ ऑक्टोबर १८७६)
१९८० : स्वतंत्र भारताचे चोथे राष्ट्रपती वराहगिरी व्यंकटा गिरी उर्फ वी. वी. गिरी यांचे निधन.
१९९७ : संयुक्ता पाणिग्रही ओडीसी नर्तिका (जन्म: २४ ऑगस्ट १९४४)
२०१३ : इटलीचे वे४० पंतप्रधान एमिलियो कोलंबो यांचे निधन. (जन्म: ११ एप्रिल १९२०)

# तेलंगणात काँग्रेस सरकारनं कर्जमाफीचा निर्णय घेतला, महाराष्ट्रातही कर्जमाफी व्हावी

तेलंगणामध्ये काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफीचा करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात देखील कर्जमाफी व्हावी, अशी आमची मागणी असल्याचे वक्तव्य किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी केलं आहे. याआधी कर्जमाफी करण्यात आली मात्र, त्यात अटी शर्ती इतक्या लागू केल्या की लाखो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले होते. त्यामुळं आता जर सरकार कर्जमाफी करणार असेल तर अटी शर्तींच्या बाबतीत सरकारने योग्य तो निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांची फसवणूक करु नये असे अजित नवले म्हणाले.

४० लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी

तेलंगणामधील काँग्रेस सरकारने ४० लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री रेवंथा रेड्डी यांनी ३१ हजार कोटींच्या शेती कर्जमाफीला मंजुरी दिली आहे. शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्याची घोषणा काँग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात दिली होती. त्याप्रमाणं सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. तेलंगणा मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. यात ३४ हजार कोटी रुपयांच्या कृषी कर्ज माफीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. १५ ऑगस्टपूर्वी शेतकऱ्यांचे कर्ज सरकार माफ करेल, असे आश्वासन मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी दिले आहे.

तेलंगणा सरकारने ३४ हजार कोटींची कर्जमाफी केली आहे.

# पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे रस्त्याची दुरावस्था

## शेळके वस्तीवरील ग्रामस्थ अडचणीत–डॉ.गणेश ढवळे





लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बेलगाव गावातील शेळके वस्तीवरील रस्ता ग्रामस्थांनी स्वखर्चाने केलेला आहे. उन्हाळ्यात पवनचक्की प्रकल्प धारकांनी याच वस्ती रस्त्यावरून जड वाहनाने साहीत्याची वाहतूक केल्याने रस्ता खचला आहे.सध्या पावसाळयात याठिकाणी मोठ्ठ मोठे खड्डे पडल्यामुळे गुडघाभर पाणी साचत असुन चिखलातुन ये जा करताना गावात जाण्यासाठी शाळकरी मुले, भाजीपाला उत्पादक, महिला वृद्ध यांना दवाखाना, बाजारहाट तसेच शेतक–यांना खत बि – बियाणे वाहतूक करण्यासाठी अडचण निर्माण झाली आहे. पवनचक्की अधिकारी फोन सुद्धा उचलत नाहीत.त्यामुळे आमच्या रस्त्याची तातडीने सोय करण्यात यावी.अशी मागणी किसन शेळके,आप्पासाहेब शेळके,भरत शेळके, दामोदर जोगदंड, बाबासाहेब जोगदंड, अतुल शेळके, श्रीराम शेळके, राजेंद्र शेळके,शरद शेळके मोहन शेळके यांनी केली आहे.

पवनचक्की धारकांनी त्यांच्या वाहनांच्या सोयीसाठी सुरक्षित ठिकाणी असणारा विद्युत पोल य वाहतुकीच्या मार्गावरील बांधावर उभा केला असुन पावसाळ्यात वाहत्या पाण्याने बांधाची माती वाहून गेली असुन वादळी वाऱ्यासह पावसाने पोल पडण्याची शक्यता असुन भविष्यात दुर्घटना घडुन पशु अथवा माणसाचा बळी गेल्यास जबाबदार कोण?? असा प्रश्न मोहन शेळके यांनी उपस्थित केला आहे. बालाघाटावर पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरू असुन पवनचक्की प्रकल्प उभारताना स्थानिक दलाला मार्फत अडाणी शेतकऱ्यांची दिशाभूल करून पवनचक्की प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहित करताना भुलथापा देत नियमांची पायमल्ली करून प्रकल्प उभारण्यात येत असल्याच्या लेखी तक्रारींचे प्रमाण वाढले असुन शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर सुद्धा महसूल व पोलीस प्रशासन अन्याय ग्रस्त शेतकऱ्यांच्या बाजूने ऊभे राहण्याऐवजी कंपनीची पाठराखण करत कंपनीचीच बाजु घेऊन शेतकऱ्यांना दमदाटी करत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. पुढारी आणि महसूल अधिकारी यांच्या संगनमताने पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरू आहे.



# उपसरपंचपदी दिपक कर्डिले यांची बिनविरोध निवड

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेली कडा ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी दिपक सुरेश कर्डीले यांची बिनविरोध निवड झाली आहे. आ.सुरेश धस यांचे खंदे समर्थक असून आ.धस मार्गदर्शनाखाली बिनविरोध निवड करण्यात आली ही ह्या निवडणूक प्रक्रियेत निवडणूक अधिकारी म्हणून कडा मंडळाधिकारी वर्धमान देवधरे व तलाठी जगदिश राऊत, काम पाहिले तर यावेळी अध्यक्षीय अधिकारी म्हणून लोकनियुक्त सरपंच लताबाई भिमराव पाटील तर सचिव म्हणून त्रिब्यंक मुळीक यांनी सहकार्य केले त्यानंतर दिपक सुरेश कर्डीले यांची उपसरपंच पदी निवड झाल्याचे जाहीर केले

तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कडा ग्रामपंचायतच्या रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी दिपक सुरेश कर्डीले यांचा एकमेव अर्ज आल्याने सर्वानुमते मते त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. नवनिर्वाचित उपसरपंचपदी दिपक कर्डीले यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल आ. सुरेश धस, युवा नेते जयदत्त धस, सभापती रमजान तांबोळी, युवराज पाटील, माजी सभापती संजय ढोबळे, माजी सरपंच रामशेठ मधुरकर, अनिल ढोबळे, बाळासाहेब कर्डीले, माजी सरपंच संपत सांगळे, सुभाष ढोबळे, बाळासाहेब देशमुख, माजी उपसरपंच संभाजी कर्डीले, राजबापू कर्डीले, किरण काळे, सचिन कर्डीले, तानाजी कर्डिले, बबलू पानसरे, योगेश भंडारी, बिपीन भंडारी, बाळासाहेब देशमुख, राजू साळवे, सागर खेडकर, गौतम कर्डीले, मोहमद सय्यद, जयंत खंदारे, संजय ढोबळे, बंडू सय्यद, आरिफ शेख, छगन कर्डीले, विष्णू कुसळकर, भाऊसाहेब भोजने, दत्ता होळकर, ज्ञानेश्वर चौधरी,माऊली गायकवाड , सागर ढोबळे आदींसह समस्थ ग्रामस्थाच्यावतीने सत्कार करून नवनिर्वाचित उपसरपंच दिपक कर्डीले यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# सामाजिक सलोखा जपण्यासाठी सामुहिक प्रयत्न गरजेचे –मुंदडा

## रविवार पेठेतील निजामकालीन पोलिस चौकीचे नुतनीकरण व लोकार्पण



अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रतिनिधी समाजातील सामाजिक सलोखा जपण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज आहे. पोलिस व जनता यांच्यामध्ये समन्वयक साधण्यासाठी रोटरी क्लबच्या पुढाकारातून निजामकालीन चौकीचे लोकार्पण झाले.ही ऐतिहासिक वास्तु शहरवासियांच्या कामी आली. ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांनी केले.

रविवार पेठ परिसरातील निजामकालीन चौकीचे नुतनीकरण रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने करण्यात आले. या इमारतीच्या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटक म्हणून नंदकिशोर मुंदडा बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पर पोलिस अधिक्षक चेतना तिकडे तर प्रमुख अतिथी म्हणून पोलिस उपअधिक्षक अनिल चौरमले, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी आ.पृथ्वीराज साठे, माजी उपनगराध्यक्ष शेख रहिम, नगरसेवक बालासाहेब पाथरकर, शेख खलील मौलाना, माजी उपनगराध्यक्ष सारंग पुजारी, सामाजिक कार्यकर्ते महेश लोमटे, पोलिस निरिक्षक विनोद घोळवे, रोटरीचे अध्यक्ष स्वप्नील परदेशी, सचिव गणेश राऊत, प्रकल्प संचालक कल्याण काळे, सहसंचालक भिमसेन लोमटे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी बोलताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले की, समाजातील अनेक बाबींना रोटरी क्लबच्या माध्यमातून न्याय दिला जातो. आजही जुन्या पोलिस चौकीचे नुतनीकरण करून रोटरीने प्रशासनाला मोठी मदत केली आहे. आ.नमिता मुंदडा यांच्या माध्यमातून पोलिसांच्या निवासस्थानाचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे यावेळी मुंदडा यांनी सांगितले. यावेळी बोलताना चेतना तिडके म्हणाल्या की, गावची कायता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी या नव्या पोलिस चौकीत पोलिस कर्मचार्यांची संख्या वाढविण्यात येईल. या चौकीच्या माध्यमातून या भागाचे निर्माण होणारे प्रश्न व समस्या दुर करण्यासाठी पोलिस प्रशासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पोलिस उपअधिक्षक अनिल चौरमले, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी आ.पृथ्वीराज साठे, पोलिस निरिक्षक विनोद घोळवे यांची भाषणे झाली. वृक्षपुजन व वृक्षास पाणी घालून कार्यक्रमास प्रारंभ झाला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पोलिस चौकीच्या नूतनीकरणाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्नील परदेशी यांनी केले. तर संचलन शैलेश स्वामी यांनी केले तर उपस्थितांचे आभार भिमसेन लोमटे यांनी मानले. या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते, रोटरी क्लबचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांची बुद्ध विहारात जेष्ट पौर्णीमा उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

तथागत भगवान बुद्धांच्या जिवनात वर्षाच्या बारा पौर्णीमांना महत्व आसुन प्रत्येक पौर्णिमा बौद्ध बांधव विविध ठीकाणी उत्साहात साजरी करत आसतात याच प्रमाणे सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका – शाखा माजलगांव च्या वतीने जेष्ठ पोर्णिमा साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष आद.गुलाबराव धाईजे हे होते तर या कार्यक्रमा साठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्वचे संस्कार उपाध्यक्ष एस.बी . मोरे,जिल्हा संस्कार सचिव श्यामभाऊ वाघमारे,जिल्हा पर्यटन सचिव काशीराम साळवे,एन.बी राजभोज,जिल्हा संघटक बी.सी. डोंगरे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते अंकुश आण्णा जाधव, धम्मानंद साळवे, बहुजन समाज पार्टी चे अभिमन्यु साळवे, हरिभाऊ साळवे,शेलापुरीचे उपसरपंच नाथा घडसे हे उपस्थित होते या कार्यक्रमात मान्यवरांनी ज्येष्ठ पौर्णीमेचे महत्व सांगत संस्थेची कार्यपद्धती यासह विविध विषयांवर मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा तालुका संस्कार सचिव आशाताई मोरे यांनी केले तर, आभार भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य डी.पी. वाघमारे यांनी मानले तर सुत्रसंचलन संस्थेचे ता सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले या कार्यक्रमा साठी आयु . कांताताई हिरवे, आयु.पंचशीला गायसंमुद्रे,आयु. शशिकला संमुद्रे यांनी भोजन दान दिले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. भागवत साळवे,चक्रधर पोटभरे,डी पी पोटभरे,मोहनराव काकडे, बाबासाहेब घनघाव,नितीन डोंगरे, राजभाऊ साळवे तात्यासाहेब साळवे, भगवान डोंगरे, रामभाऊ डोंगरे, सटवाजी मस्के, डी.के.संमुद्रे, फुलवरे, विशाखा वाघमारे, मंदा साळवे, रमाताई, राजभोज, निलाबाई साळवे, छाया साळवे सह भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# सामाजिक उपक्रम राबवून स्व.विनायक मेटे यांची जयंती साजरी करणार– चौधरी

कडा । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना अत्यंत सामान्य घरातून आलेल्या बहूजननायक लोकनेते स्व.विनायक मेटे यांनी राज्याच्या राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.त्यांनी आयुष्यभर गरजवंत मराठा, धनगर,मुस्लिम आरक्षणाच्या चळवळीत कायम पुढे आणि आक्रमक असलेल्या स्व. विनायक मेटे यांनी आपल्या जीवनात सतत सामाजिक बांधिलकी जपत सामुदायिक विवाह,नशाबंदी,व्यसनमुक्ती,अजित बालिका (मुलीचा जन्मदर), तसेच स्वच्छता मोहीम,पर्यावरण संरक्षण करण्यासाठी वृक्षरोपन,रक्तदान शिबिर,सुप्रसिद्ध डॉक्टरांच्या निगराणी खाली सर्वरोग निदान शिबिर या सारख्या सामाजिक कामातही सदैव पुढाकार घेतला.

स्व.मेटे साहेबांनी राज्याच्या राजकारणात आणि समाजकारणात साधारणपणे सतत ३५ वर्षे आपला कार्यकतृत्वाचा ठसा उमटून आपले वेगळेपण सिद्ध केले मराठा आरक्षण,अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या स्मारकासाठी आंदोलन रस्त्यावर व विधीमंडळात कायम लाऊन धरले वेळप्रसंगी विधिमंडळ बंद पाडले यासह मुस्लिम,धनगर आरक्षणाच्या बाबतीतही त्यांनी पुढाकार घेतला.ईडब्ल्यूएस, स्पर्धा परीक्षेतील मराठा तरुणांच्या वयाचा मुद्दा यासाठी विनायक मेटे यांनी गल्ली ते दिल्ली आवाज उठवला.परंतु दुर्दैवाने मराठा आरक्षणासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयोजित केलेल्या बैठकीला जातानाच अपघातात निधन झाले. येत्या ३० जुन रोजी त्यांची जयंती साजरी होत आहे.

लोकनेते स्व.विनायक मेटे साहेबांनी घालून दिलेला वसा आणि वारसा पुढे चालविण्याचे काम डॉ.ज्योतीताई मेटे करीत आहेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते स्व. विनायक मेटे साहेबांच्या जयंतीनिमित्त आष्टी तालुका शिवसंग्रामच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार असल्याचे सांगितले आहेत. याचाच भाग म्हणून जागर स्मृतीचा अभियान हाती घेतले व जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी करावी जेणेकरून गोरगरीब उंचीत उपेक्षितांना त्यातून लाभ मिळावा.



**माजलगाव:– तालुक्यातील तलाठी सज्ञा कोथरुळ अंतर्गत मौजे साळेगाव येथे वुक्षारोपण करतांना नायब तहसीलदार परमेश्वर चाफाकानडे, तलाठी रुपचंद आभारे व साळेगाव येथील ग्रामस्थ**

# डॉ.राजेश इंगोले यांचा सत्कार म्हणजे हे एक भाग्य शाली व्यक्तिमत्व-सोनूजी डगवाले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पत्रकार व कलावंतांच्या पुढाकाराने डॉ राजेश इंगोले यांचा सत्कार होतोय म्हणजे हे एक भाग्य शाली व्यक्तिमत्व आहे असे उदगार दिशा प्रतिष्ठान लातूरचे अध्यक्ष श्री सोनूजी डगवाले यांनी काढले.मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई व मनोहरी अंबानगरी कलाकार कट्टा यांच्या वतीने सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये विश्वविक्रमी नोंद झाल्याबद्दल व इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अंबाजोगाईचे अष्टपैलू व्यक्तिमत्व सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ, नगरपालिकेचे माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांच्या गौरव समारंभा निमित्य आयोजित कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्री सोनूजी डगवाले हे बोलत होते.



या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ श्रीनिवास रेड्डी, प्रा ईश्वर मुंडे, ग्रामीण विकास मंडळाचे अध्यक्ष सय्यद सर, अंबाजोगाई तालुका वैद्यकीय अधिकारी बालासाहेब लोमटे तर अध्यक्ष स्थानी स्वा रा ती चे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांची उपस्थिती होती. या वेळी बोलताना सोनूजी डगवाले पुढे म्हणाले, पत्रकार आणि कलावंत यांचं नात जुळत, कलावंत आणि डॉक्टर यांचं नात जुळत मात्र पत्रकार आणि डॉक्टर यांचं नात जुळलेली असतात अशी राज्यात फार दुर्मिळ उदाहरण आहेत. आज पत्रकारांच्या पुढाकारातून डॉक्टरचा सत्कार होतोय हे पहिल्यांदा पहातोय. पत्रकार ही अशी शक्ती आहे ज्या पत्रकारांनी अनेक नेते घडवले आणि अनेक नेते घरी बसवले आज अंबाजोगाईचे पत्रकार डॉक्टरांच्या पाठीशी खंबीर पणे उभा आहेत हे या भव्य कौतुक सोहळ्या वरून स्पष्ट होतंय. प्रकाशजी बोरगावर यांच्या विषयी

बोलताना सोनूजी म्हणाले की लातूर ने अंबाजोगाई ला दिलेली गिफ्ट म्हणजे प्रकाश बोरगावकर असून मी २० वर्ष ज्या गुरुजी कडे शिकलो त्यांचं माझ्यावर जीवापाड प्रेम होतं मात्र त्यांच्या कडून माझ्यावर कौतुकाची थाप पडली नाही आज डॉ इंगोले यांनी संगीत क्षेत्रात मिळवलेल्या लौकिका बद्दल प्रकाश बोरगावकर यांनी जी कौतुकाची थाप दिली त्या बद्दल त्यांचं कौतुक केलं. या वेळी बोलताना डॉ श्रीनिवास रेड्डी म्हणाले की, पॉझिटिव्ह एनर्जी काय असते ते डॉ इंगोले यांच्या कडुन शिकायला हवी त्यांनी इंडियन मेडिकल असोसिएशनचे काम करताना आमच्या सारख्या डॉक्टर मंडळी मध्ये ही नवं चेतन्य आणण्यासाठी जे प्रयत्न केले त्याला तोड नाही. या वेळी सत्काराला उत्तर देताना डॉ राजेश इंगोले म्हणाले की, कोल्हापूर च्या कलावंत व रसिकांनी सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड साठी माझी निवड केली हे मी माझं भाग्य समजतो व या निवडीतून माझा संगीत क्षेत्रात जो नावलौकिक झाला या मूळ माझा हा गौरव आज मराठी पत्रकार परिषद व अंबाजोगाईच्या कलावंतांच्या पुढाकारातून होतोय. माझ्यावर प्रेम करणारी माणसे सत्काराला या ठिकाणी आली असून आभाळा एवढ्या उंचीची ही मानस आहेत, मला जीवनात प्रेरणा देणारी माणसे मिळाली या पैकीच प्रकाश बोरगावकर, दत्ता अंबेकर हे असल्याने अंबाजोगाईच्या मातीशी माझी नाळ जोडली आहे. आपल्या जीवन प्रवासावर प्रकाश टाकताना डॉ राजेश इंगोले भावुक झाल्याने त्यांना आपल्या डोळ्यातील अश्रू आवरता आले नाहीत. अध्यक्षीय समारोपात बोलताना डॉ शंकर धपाटे म्हणाले की, डॉ राजेश इंगोले हे एक एनर्जीक रसायन असून त्यांनी कोविड काळात केलेले कार्य हे कोणीही नाकारू शकत नाही. या प्रसंगी आय एम ए महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतीक कार्यकारणीवर मध्यवर्ती सदस्य म्हणून अंबाजोगाईचे नेत्ररोग तज्ञ डॉ योगेश मुळे ,बालरोगतज्ञ डॉ विजय लाड व नेत्ररोगतज्ञ डॉ प्रज्ञा किनगावकर यांची निवड झाल्या बद्दल सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कलाकार कट्टाचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश बोरगावकर यांनी डॉ राजेश इंगोले व सोनूजी डगवाले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन परमेश्वर गित्ते तर आभार प्रदर्शन दत्तात्रय अंबेकर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बळीराम उपाडे, नाना गायकवाड, बालाजी शेरेकर, रोहिणी गायकवाड, अभय जोशी, शिवकुमार मोहेंकर, महादेव माने, प्रशांत लाटकर, गजानन मुडेगावकर, ज्ञानेश मातेकर, अशोक दळवे, मारुती जोगदंड, मुशीर बाबा, शेख फिरोज, व्यंकटेश जोशी, बाळासाहेब फुलझळके यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी डॉ लक्ष्मण लाड, डॉ चंद्रकांत चव्हाण, डॉ उद्धव शिंदे, डॉ इम्रान सर, डॉ जुबेर शेख, डॉ सचिन चाटे, डॉ बळीराम मुंडे, डॉ कौस्तुभ कुलकर्णी, डॉ योगेश सुरवसे, डॉ बचुटे, डॉ पेस्ते, डॉ प्रतीक सिरसाट, डॉ विनायक गडेकर, डॉ चामनर, डॉ जैन, डॉ बालासाहेब हाके, डॉ अविनाश देशमुख यांच्या सह जेष्ठ पत्रकार अ र पटेल, सुदर्शन रापतवार, सलीम गवळी, प्रकाश लखेरा, नागनाथ वारद, संजय राणभरे, परमेश्वर वैद्य, आभिजित लोमटे, सतीश मोरे, नागेश औताडे, संजय जोगदंड, अरेफ सिद्धीकी, विष्णू कांबळे, सय्यद नईम आदी मराठी पत्रकार परिषद व अन्य संघटनाचे पदाधिकारी, आय एम ए चे पदाधिकारी, विविध क्षेत्रातील कलावंत, समाधान हॉस्पिटलचा कर्मचारी वर्ग व डॉ इंगोले यांचे शुभ चिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आठ दिवस झाले तरी विद्यार्थ्यांना गणवेशाचा पत्ताच नाही

## शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी गणवेश देण्याची झाली होती घोषणा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १५ जूनला गणवेश देऊ अशी घोषणा केली होती. शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनीही यासाठी जवळपास बाराशे कोटी रुपये तरतूद केल्याचे सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात शाळा सुरु होऊन आठ दिवस झाले तरी अद्याप विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले नाही. विशेष म्हणजे महिला आर्थिक विकास महामंडळाकडे हे गणवेश तयार करण्याची जबाबदारी दिली होती त्यांच्याकडे अद्याप कपडाच दिलेला नाही तर गणवेश कधी तयार होणार हा मोठा प्रश्न आहे.सरकारच्या केवळ पोकळ घोषणा असल्याचे यावरून स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्रात सध्या न मागताही अनेक सवलतींच्या घोषणा केल्या जात आहेत .ज्येष्ठ नागरिकांना मोफत बस प्रवास,



महिलांना ५० टक्के सवलत अशा अनेक घोषणा सरकारने केल्या त्यावर कारवाई केली. मात्र याची मागणी कोणीही केलेली नव्हती. अशाच प्रकारची पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी गणवेश देण्याची घोषणा सरकारने केली आहे .याची मागणी कुठल्याही पालकांनी केली नव्हती .मात्र तरी सरकारने उदारता दाखवत गणवेश देण्याची घोषणा केली शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी यासाठी जवळपास बाराशे कोटी रुपयांची तरतूद केल्याचेही सांगितले होते. मात्र या गणवेश तयार करण्याची तयारी एप्रिलमध्ये सुरू झाली असती तर आतापर्यंत विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले असते .मात्र निवडणुकीच्या धामधुमीत सरकारमधील नेतेही हे आश्वासन विसरले .शाळा सुरू होऊन आठ दिवस झाले तरी अद्याप ज्या महिला बालकल्याण विभागाच्या अखत्यारित असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गटांकडे हे गणवेश शिवण्याचे काम देण्यात येणार होते . या विभागाकडे गणवेश शिवण्याची जबाबदारी देण्यात आली होती. त्या विभागाकडे अद्याप सरकारने गणवेशासाठी लागणारे कापड दिले नसल्याने गणवेश होणार कधी हा मोठा प्रश्न आहे. शाळा सुरू होऊन आठ दिवस झाले आहेत .अद्याप कपडाच आला नाही. कपडा कधी येणार आणि कधी गणवेश तयार होणार हा मोठा प्रश्न आहे .प्रत्येक जिल्ह्यातील बचत गटांकडे हे काम देण्यात येणार होते. मात्र ही घोषणा हवेतच विरणार की काय ?अशी शंका येऊ लागली आहे. कुठलेही काम वेळेत झाले तर त्या कामाचे महत्त्व असते. मात्र सरकारला याचे भान राहिलेले दिसत नाही. सरकारने घोषणा तर केली मात्र ती पूर्ण केली नाही. त्याचे गांभीर्य सरकारला फारसे दिसत नाही. आज अनेक विभागाच्या कर्मचाऱ्यांना गेल्या चार महिन्यापासून पगार नाहीत. हे पगार कधी मिळणार हे माहीत नाही. कंत्राटी कर्मचाऱ्यांना तर सहा सहा महिने पगार मिळत नाही. अशा परिस्थितीत सरकार अशा पोकळ घोषणा करून नेमके काय साधणार आहे .ज्या घोषणा पूर्णच होणार नाहीत त्यासाठी सरकार विनाकारण घोषणा करून वेळ मारून का नेता आहे. याच्या पाठीमागचे गोड बंगाल समजत नाही .अशा अनेक घोषणा आहेत ज्याची कधीच मागणी झाली नाही. मात्र ज्यांची जनतेला गरज आहे अशा अनेक बाबींची मागणी करूनही त्याची पूर्तता सरकारकडून होत नाही .असा विरोधाभास सध्या महाराष्ट्रात दिसत आहे. विद्यार्थ्यांना येथे आठ दिवसात गणवेश वाटप करावेत अशी अपेक्षा पालकांनी शिक्षकांनी केली आहे.

### माविमकडे कपडाच आला नाही

गणेश शिवण्याचे काम महिला बालकल्याण विभागाच्या अंतर्गत असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गटाकडे देण्यात आले होते .मात्र सरकारने गणवेश होण्यासाठी कपडा त्यांना दिला नाही तर गणवेश शिवण्याचा आणि ते विद्यार्थ्यांपर्यंत येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

### नेमका हा उद्योग कशासाठी

विद्यार्थी आणी पालकांकडून गणवेशाची मागणी नसतानाही सरकारच्या शिक्षण विभागाने पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गणवेश देऊ अशी घोषणा केली आणि हे गणवेश शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी देऊ असे ठासून सांगितले .मात्र प्रत्यक्षात हे गणवेश मिळालेच नाहीत हे बाराशे कोटी नेमके कोणाच्या घशात घालणार? केवळ कंत्राटदार जगवण्यासाठीच या योजना आहेत की काय असा प्रश्न सर्वसामान्यांना पडत आहे.

# वैष्णवीच्या शिक्षणास मिळणार आधार माणुसकीचा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

इंजेगाव येथील कु. वैष्णवी भरतराव मुंडे या विद्यार्थिनीने परिस्थितीवर मात करत नीट परीक्षेत ६३७ गुण प्राप्त केले आहेत.

वैष्णवीचे वडील अल्पभूधारक असून, ते दुसऱ्याच्या शेतामध्ये सालगडी म्हणून काम करतात, त्यांना दोन मुली असून दोन्ही मुली अतिशय गुणवंत असल्याने वैष्णवीच्या आई-वडिलांनी मुलींना चांगले शिक्षण मिळावे यासाठी काबाड कष्ट करत आहेत . वैष्णवी ने नीट परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल वर्तमानपत्रात अभिनंदनची बातमी प्रसिद्ध झाल्यास बीड जिल्ह्यातील सामान्य कुटुंबातील गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक



पाठबळ देणारी संत गाडगेबाबा सेवाभावी संस्था ,अंबाजोगाई अंतर्गत आधार माणुसकीचा उपक्रमाचे प्रमुख ॲड संतोष पवार यांना वैष्णवीने मिळविलेले यश या बद्दलची माहिती मिळताच वैष्णवीच्या कुटुंबाची भेट घेऊन तिचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सकाळचे पत्रकार प्रशांत बर्दापूरकर हे उपस्थित होते. वैष्णवीचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात साठी प्रवेश निश्चित झाल्या नंतर तिच्या वैद्यकीय शिक्षणाची प्रत्येक वर्षाची शैक्षणिक फीस, वसतिगृह फीस आधार माणुसकीचा उपक्रमाच्या माध्यमातून भरण्यात येणार असल्याचे तिच्या कुटुंबीयाला सांगण्यात आले, त्यावेळी

# प्रसिद्ध व्यापारी मनोज अग्रवाल यांना मातृशोक

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील अग्रवाल मेडिकल तथा सॅमसंग मोबाईल शॉपीचे संचालक मनोज अग्रवाल यांच्या मातोश्री गीतादेवी गणपतलालजी अग्रवाल यांना दिनांक २२ जून २०२४ शनिवार रोजी हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यातच त्यांचे निधन झाले. मृत्यू समयी त्या ८० वर्षांच्या होत्या. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार मरणोपरांत त्यांचे डोळे दान करण्यात आले. जिल्हा रुग्णालयाचे नेत्र शल्य चिकित्सा तज्ञ डॉ. राधेश्याम जाजू यांनी गीता देवी यांचे डोळे संकलित केले. गीतादेवी आज या जगातून गेल्या असल्या तरी त्यांच्या डोळ्यांद्वारे दोन नेत्रहीन लोक हे जग पाहतील.



गीतादेवी यांनी पती गणपतलालजी अग्रवाल यांच्यासोबत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपल्या संसाराचा गाळा रेटला. सर्व मुलांना उच्च शिक्षण दिले. त्यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ व दयाळू होता. त्यांचे व त्यांचे पती गणपतलालजी अग्रवाल यांचे चांगले गुण त्यांच्या सर्व मुलांमध्ये आले आहेत. त्यातही सर्वात लहान पुत्र

# नाहक खर्च टाळून सामाजिक उपक्रम राबवत वाढदिवस केला साजरा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील भावठाणा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भावनाथेश्वर मंदिर संस्थान चे अध्यक्ष बसवेश्वर यादव व सचिव रवि मामा कदम यांच्या वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. यावेळी गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

सध्या वाढदिवस म्हटलं की फटाके, हार, तुरे व बॅनर बाजी केली जाते तसेच डीजे लावून जल्लोष केला जातो. हा नाहक खर्च टाळून भावठाणा येथील सामाजिक कार्यकर्ते बसवेश्वर यादव व रवी कदम यांच्या वाढदिवसानिमित्त



गावातील तीस तरुणांनी रक्तदान करून हा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केला.

गावातील शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच विविध परीक्षेत गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कु. मस्के अंजली अमोल, कु. लोमटे पूनम सत्यनारायण, कु. यादव अदिती गोपीनाथ, कु. सपकाळ शिवानी शिवशंकर, कु.समीक्षा संजय कापसे, कु. तेजस्विनी रामभाऊ घोरपडे, चि.स्वप्निल श्रीमंत काळे, कु.ऋतुजा संभाजी पांचाळ,

# सामाजिक उपक्रम राबवून लोकनेते स्व.विनायकराव मेटे यांची जयंती साजरी करणार:- ज्ञानेश्वर चौधरी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना अत्यंत सामान्य घरातून आलेल्या बहूजननायक लोकनेते स्व.विनायक मेटे यांनी राज्याच्या राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.त्यांनी आयुष्यभर गरजवंत मराठा, धनगर,मुस्लिम आरक्षणाच्या चळवळीत कायम पुढे आणि आक्रमक असलेल्या स्व. विनायक मेटे यांनी आपल्या जीवनात सतत सामाजिक बांधिलकी जपत सामुदायिक विवाह,नशाबंदी,व्यसनमुक्ती,

अजित बालिका (मुलीचा जन्मदर), तसेच स्वच्छता मोहीम,पर्यावरण संरक्षण करण्यासाठी वृक्षरोपन,रक्तदान शिबिर,सुप्रसिद्ध डॉक्टरांच्या निगराणी खाली सर्वरोग निदान शिबिर या सारख्या सामाजिक कामातही सदैव पुढाकार घेतला. स्व.मेटे साहेबांनी राज्याच्या राजकारणात आणि समाजकारणात साधारणपणे सतत ३५ वर्षे आपला कार्यकतृत्वाचा ठसा उमटून आपले



वेगळेपण सिद्ध केले मराठा आरक्षण,अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या स्मारकासाठी आंदोलन रस्त्यावर व विधीमंडळात कायम लाऊन धरले वेळप्रसंगी विधिमंडळ बंद पाडले यासह मुस्लिम,धनगर आरक्षणाच्या बाबतीतही त्यांनी पुढाकार घेतला.ईडब्ल्यूएस, स्पर्धा परीक्षेतील मराठा तरुणांच्या वयाचा मुद्दा यासाठी विनायक मेटे यांनी गल्ली ते दिल्ली आवाज उठवला.परंतु दुर्दैवाने मराठा आरक्षणासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयोजित केलेल्या बैठकीला जातानाच अपघातात निधन झाले. येत्या ३० जुन रोजी त्यांची जयंती साजरी होत आहे. लोकनेते स्व.विनायक मेटे साहेबांनी घालून दिलेला वसा आणि वारसा पुढे चालविण्याचे काम डॉ.ज्योतीताई मेटे करीत आहेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते स्व. विनायक मेटे साहेबांच्या जयंतीनिमित्त आष्टी तालुका शिवसंग्रामच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार असल्याचे सांगितले आहेत. याचाच भाग म्हणून जागर स्मृतीचा अभियान हाती घेतले व जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी करावी जेणेकरून गोरगरीब उंचीत उपेक्षितांना त्यातून लाभ मिळावा. समाजातील वंचित घटकांना आधार मिळावा हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून कार्यकर्त्यांना ते नेहमी प्रोत्साहन देत असत आज मेटे साहेब आपल्यामध्ये नाहीत परंतु त्यांचा सामाजिक व वैचारिक वसा वारसा शिवसंग्रामचे शिलेदार पुढे चालवतील असा विश्वास शिवसंग्रामचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी व्यक्त केला.

# गुणवंत विद्यार्थी घडवणारी एकमेव शाळा म्हणजे श्री व्यंकटेश विद्या मंदिर होय -राजेसाहेब देशमुख

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई ही शिक्षणाचे माहेरघर असून या माहेरघरांमध्ये विद्यार्थी घडविण्याचे काम श्री व्यंकटेश विद्यामंदिरने खूप मोठ्या प्रमाणात केलेला असून गुणवंत विद्यार्थी घडवणारी शाळा म्हणजे श्री व्यंकटेश विद्यामंदिर होय असे मत बीड जिल्हा शिक्षण व आरोग्य माजी सभापती राजेसाहेब देशमुख यांनी आपले मत मांडले. श्री व्यंकटेश विद्या मंदिर येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बारामती येथील उत्कर्ष ग्रुपचे सर्वेसर्वा नितीनजी जगताप साहेब हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून बारामतीचे उद्योजक दिलीपरावजी सूर्यवंशी साहेब, माळेगाव सहकारी साखर कारखान्याची मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्रजी जगताप साहेब.पर्यावरण अधिकारी सचिनजी भोसले



साहेब.श्री तिरुपती शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बप्पासाहेबजी जाधव पाटील साहेब गंगा माऊली शुगर चे चेअरमन हनुमंतरावजी मोरे साहेब.वीर हनुमान शिक्षण संस्थेचे सचिव राहुल भैया सोनवणे साहेब.संस्थेचे कोषाध्यक्ष राजेश जी पाटील दादासाहेब.संस्थेचे अध्यक्ष किरण जी पाटील भैय्यासाहेब. वीर हनुमान शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रवी बापू सोनवणे साहेब संतोष शिंदे.राजेंद्र अवताडे.शंभूराजे देशमुख यशवंत देशमुख.संस्थेचे संचालक भूषण पाटील साहेब धीरज पाटील साहेब.आधी उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक धनंजय शिंदे यांनी केले.यावेळी बोलताना राहुल भैया सोनवणे यांनी सांगितले की.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बप्पासाहेब जाधव पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा अतिशय सुंदर रित्या अध्यापनाचे काम करत आहे.यांनी जे शिक्षणासारखी अतिशय पवित्र काम हाती घेतल्यामुळे

# लोकनेते स्व.विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त 'कृतज्ञता सप्ताह' ची सुरवात वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिराने

बीड । प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे साहेब हे वंचित उपेक्षितांचे कैवारी म्हणून महाराष्ट्रभर त्यांची ओळख होती. मराठा आरक्षण आणि आरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक व्हावे यासाठी त्यांनी आपली हयात संघर्ष करण्यात घालवली त्याचबरोबर त्यांनी इतर समाज आणि सामजिक प्रश्नांसाठी देखील लढा उभा केला. ३० जून रोजी त्यांची जयंती संपूर्ण महाराष्ट्राभर त्यांच्यावर प्रेम करणारे त्यांचे चाहते आणि शिवसंग्रामचे मावळे सामाजिक उपक्रम राबवून साजरी करणार आहेत आणि स्व.मेटे साहेब यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणार आहेत. या निमित्त दि २३ जून ते २९ जून या कालावधीत ''कृतज्ञता सप्ताह'' आयोजन केले आहे .याची सुरुवात रविवार २३ जून पासून रक्तदान आणि वृक्षारोपण या सामजिक उपक्रमांनी करण्यात आली.

स्व.विनायकराव मेटे यांनी आपल्या





रक्तदान आणि वृक्षारोपण करत लोकनेते स्व.विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त कृतज्ञता सप्ताहची सुरुवात

जीवनात सामजिक उपक्रमांना महत्व दिले सामजिक उपक्रम साजरे करत त्याचा सर्वसामान्याना फायदा व्हावा हा त्यांचा नेहमीच मानस असत त्यांनी त्यांच्या हायातीत देखील वाढदिवस साजरा करताना बिंदुसरा नदी स्वच्छ्ता मोहीम, शहर स्वच्छ्ता मोहीम, व्यसन मुक्ती अभियान, रोजगार मेळावे , रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप इत्यादी सामजिक उपक्रम राबवत आपले वाढदिवस साजरे केले. त्यामुळे स्व.मेटे यांना अभिप्रेत अश्या उपक्रमांनी त्यांची जयंती साजरी व्हावी या शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती मेटे यांच्या संकल्पनेला प्रतिसाद देत स्व. मेटे यांच्या चाहत्यांनी आणि शिवसंग्रामच्या मावळ्यांनी सामजिक उपक्रम राबवत त्यांची जयंती साजरी करण्याचा मानस केला आहे. याची सरुवात आज बीड शहरात भव्य रक्तदान शिबिराने आणि वृक्ष लागवड करत करण्यात आला यात २३० रक्तदात्यानी रक्तदान केले त्याचबरोबर शहरातील भक्ती कन्स्ट्रक्शन भागात वृक्षारोपण करण्यात आले या प्रसंगी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती मेटे , शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, प्रमुख पाहुणे एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, जिल्हा उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे,शहर अध्यक्ष सुहास पाटील, प्रा. सुभाष जाधव, नवनाथ प्रभाळे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडित माने, सामजिक न्याय विभगचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, मनोज जाधव, सचिन कोटुळे, ऍड. गणेश मोरे, सुनील कुटे, विजय सुपेकर, शेषराव तांबे,गोपीनाथ देशपांडे,सचिन जाधव, गौतम जोगदंड, विशाल हावळे,शेख कुतुब भाई, अमजद पठाण, नदीम गणी,प्रशांत डोरले, राहुल शहागडकर, गणेश साबळे, कैलास शेजाळ,अशोक लोकरे, अशोक सिंगन, पांडुरंग बहिर, शैलेश सुरवसे, ज्ञानेश्वर कोकाटे, हरीश शिंदे, सुशांत सत्राळकर, जाकेर हुसेन, शेख रहीम आदी. उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ड्रग्जप्रकरणात मोठी कारवाई, दोन पोलिसांचं निलंबन, बार सील, अनेकजण ताब्यात

पुणे: पुण्यातील एफसी रोडवरील नामांकीत हॉटेलमध्ये तरुणांचा ड्रग्जची नशा करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला अन् एकच खळबळ माजली. पुन्हा एकदा पुण्यातील मध्यरात्री सुरू असलेल्या पब्ज आणि बारचा मुद्दा ऐरणीवर आला. त्यात विरोधकांनी मंत्री शंभूराज देसाई यांच्यावर गंभीर आरोप केले. त्यानंतर प्रशासनाकडून धडक कारवाई सुरु करण्यात आली. पोलीस दलातील दोन बिट मार्शल यांचं निलंबन करण्यात आलेय. कामात हालगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. त्याशिवाय संबंधित हॉटेलही सील करण्यात आले आहे.



पुण्यातील लिक्वीड लिजर लाउंजमध्ये उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई केली. हॉटेलमधील पाच जणांना उत्पादन शुल्क विभागाने ताब्यात घेतले. हॉटेलमधील ज्या ठिकाणी परवानगी नव्हती, तिथे सुद्धा मद्य साठा ठेवला होता, त्याठिकाणी उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली. हॉटेलमधील एका मजल्यावर मद्याचा साठा ठेवण्यात आला होत्या. त्यावर उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली.

पुण्यातील एफसी रोडवरील हॉटेल, पबमध्ये तरुण-तरुणी एन्जॉयमेंटसाठी येथे येतात, ते ड्रग्ज व अंमली पदार्थांचे सेवन करत पार्टी करतात. पुण्यातील अशाच एका हॉटेलमधील पार्टीत ड्रग्स घेणाऱ्या तरुणांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यामध्ये, चक्क हॉटेलमधील वॉश रुमममध्ये टॉयलेटजवळ बसून ते ड्रग्ज घेत असल्याचे दिसून येतात. या युवकांकडील हे ड्रग्ज, मॅफेनड्रग्स असल्याचं प्राथमिक माहितीमधून समोर आलं आहे. त्यामुळे, पुण्यातील ललीत पाटील प्रकरणात आलेले ड्रग्जप्रकरण अजून शांत नसल्याचं पुन्हा स्पष्ट झालं आहे.

पोलीस उपायुक्त संदीप गिल यांनी याप्रकरणाची प्रसार माध्यमांना माहिती दिली. ते म्हणाले की, शनिवारी रात्री पुण्यातील एफसी रोडवर असलेल्या एल ३ नावाचं एक बार आहे. त्यांना दिलेल्या वेळेपेक्षा अधिक वेळेपर्यंत तो सुरू ठेवण्यात आला होता. २ मालकांनी हा बार पुढे ३ जणांना चालवायला दिला होता.

एका इव्हेंट मॅनेजरने ४० ते ५० लोकांना तिथे पार्टी करण्याची परवानगी हॉटेल मालकांना विचारली होती. रात्री १.३० नंतर बार चे मुख्य प्रवेश द्वार बंद केले आणि दुसऱ्या गेट ने तिथे आत जाण्याची परवानगी दिली. यातील सर्व जणांना ताब्यात घेतले आहे. एल ३ बार सील करण्यात आला आहे.

जो व्हिडीओ व्हायरल होतो आहे, तो पदार्थ कोणता आहे. हे अमली पदार्थ विरोधी पथक तपास करत आहेत. १८८ कलम, महाराष्ट्र दारूबंदी कायदा या अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. शिवाजीनगर पोलिस ठाण्यातील बीट मार्शल यांना निलंबित केलं आहे.

# सहजपूर फाटा येथे बस झाडावर आदळली वारकऱ्यांसह ३० प्रवासी जखमी

यवत । प्रतिनिधी

पंढरपूरवरून पुण्याला जाणारी एसटी बस झाडावर धडकून भीषण अपघात झाला. यात २५ ते ३० प्रवाशी जखमी झाले आहेत. यात काही वारकऱ्यांचा देखील समावेश आहे. हा अपघात आज (दि.२३) दुपारी १२ च्या सुमारास पुणे- सोलापूर महामार्गावर सहजपूर फाटा (ता. दौंड) येथे झाला. जखमींना उरली कांचन आणि लोणी काळभोर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले आहे.

याबाबत यवत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दुपारी १२ च्या सुमारास पंढरपूरवरून पुण्याच्या दिशेला जाणाऱ्या एसटी बसला (एमएच ४० एन ९५१९) पुणे - सोलापूर महामार्गावर सहजपूर फाटा (ता दौंड) येथे अपघात झाला. ओव्हरटेक करणाऱ्या गाडीला चुकवताना एसटीवरील नियंत्रण सुटल्याने एसटी बस



महामार्गाच्या शेजारी असणाऱ्या झाडावर जाऊन आदळली. या बसमधून आषाढी वारीसाठी पंढरपूरवरून आळंदी आणि देहूला जाणारे काही वारकरी प्रवास करत होते. या अपघातात २० ते २५ प्रवासी जखमी झाले. तर एक प्रवाशी गंभीर जखमी आहे. जखमींना उरली कांचन आणि लोणी काळभोर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले आहे

या घटनेची माहिती पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांना मिळताच पोलीस हवालदार संदीप देवकर जायभय घटनास्थळी दाखल झाले. यावेळी यवत येथील श्री दत्त ट्रान्सपोर्टचे संदीप दोरगे व उरली कांचनचे वैभव कदम यांनी तातडीने रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली. पुढील तपास यवत पोलीस करत आहेत.

# अल्पवयीन मुलीवर काका, चुलत भावाकडूनच लैंगिक अत्याचार! वडिलांचे देखील क्रूर कर्म

पुणे । प्रतिनिधी

हडपसर परिसरात एका अल्पवयीन मुलीवर काका व चुलत भावाने लैंगिक अत्याचार केल्याचा, तर वडिलांनी ही अत्याचाराचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार शनिवारी उघडकीस आला. याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, पोलिसांकडून तक्रारीची पडताळणी करण्यात येणार आहे.

हडपसर पोलिस ठाण्यात १३ वर्षी मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. त्यावरून काका, चुलत भाऊ व वडील यांच्याविरुद्ध बालकांचे लैंगिक शोषण अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार (पोस्को) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार जुलै २०२२ ते जून २०२४ या कालावधीत घडला आहे.

पीडित मुलीचे आई, वडील आणि काका, चुलत भाऊ असे एकत्र कुटुंब हडपसर जवळील एका गावात वास्तव्यास आहे. हे कुटुंबीय परप्रांतीय आहे. जुलै २०२२ मुलीच्या चुलत भावाने तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर भावाने तिला ठार मारण्याची धमकीही दिली होती. त्यामुळे मुलीने हा प्रकार कोणाला सांगितला नाही. तर, जानेवारी २०२४ मध्ये पीडित मुलीच्या काकानेही बलात्कार केला. त्यानंतर मुलीची आई काही कामानिमित्त गावी गेली असताना, तिच्या वडिलांनी ही तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी, पीडित मुलीने वडिलांना विरोध केला असता त्यांनी तिला मारहाण केली होती. त्यानंतर मुलीने हा सर्व प्रकार तिच्या आईला सांगितला, त्यानंतर तिच्या आईने पोलिसांत फिर्याद दाखल केली.

# मानसिक रुग्णांच्या कुटुंबीयांसाठी शिबिर

पुणे : 'एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ'तर्फे मानसिक आजारी व्यक्तींच्या कुटुंबीयांसाठी एकदिवसीय विनामूल्य मार्गदर्शन शिबिर आयोजित केले आहे. त्यांना शास्त्रीय माहिती सांगून, रुग्णाला सांभाळण्याची अनुभवसिद्ध कौशल्याने सक्षम करण्याचा शिबिराचा उद्देश आहे. हे शिबिर शनिवारी (ता. २९) एस. एम. जोशी सभागृहात होईल. शिबिरात ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ. अरुण रुकडीकर मार्गदर्शन करणार आहेत. समाजात मानसिक आजाराविषयी अज्ञान, स्टीग्मा असल्याने ते लपविले जाऊन आजार बळावतो. रुग्णाला स्वतःच्या आजाराविषयी कमी जाणीव असल्याने काळजीवाहकांची भूमिका महत्त्वाची ठरते. रुग्णाला सांभाळताना त्याच्याशी संवाद कसा साधावा, त्याला कसे हाताळावे, आक्रमकतेला कसे तोंड द्यावे, स्वावलंबी कसे करावे, त्याचे लग्न करावे का, आमच्यानंतर रुग्णाचे काय, तसेच उपचारासाठी डॉक्टरांशी पाठपुरावा, डॉक्टरांना काय माहिती द्यावी, निदान, औषधोपचार, त्याचे दुष्परिणामांबाबतच्या शंका, आणीबाणीच्या वेळा हाताळणे याविषयीही मनात प्रश्न असतात. त्याची उत्तरे शिबिरात नातेवाइकांना मिळतील. त्यातून रुग्णाला सांभाळण्याची कौशल्ये दिली, तर प्रश्नांमुळे त्यांना वाटणारी हतबलता, नकारात्मता कमी होईल. ते सक्षम होऊन रुग्णाला सुधारणेसाठी मदत करू शकतील. शिबिरासाठी प्राज फाउंडेशनचे आर्थिक सहकार्य मिळाले आहे.

# वाल्हे येथे पावसासाठी भैरवनाथास साकडे

वाल्हे । प्रतिनिधी

जून महिना संपत आलेला असून, अद्यापही पाऊस काय पडायचे नाव घेत नाही. त्यामुळे खरिपाच्या हंगामात शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. पावसाअभावी या भागातील पेरण्या रखडलेल्या असून, परिसरामध्ये भीषण पाणी टंचाई सदृश परिस्थितीने शेतकरी हवालदील झाला आहे. त्यामुळे चांगला पाऊस पडावा यासाठी वाल्हे (ता.पुरंदर) येथील ग्रामस्थांनी रविवार (ता. २३) पावसासाठी ग्रामदैवत श्री भैरवनाथांना साकडे घातले आहे.

वाल्ह्यासह आडाचीवाडी, सुकलवाडी, वागदरवाडी या गावांचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ आहे. ज्यावेळी पाऊस पडत नाही त्यावेळी ग्रामदैवतेला साकडे घातल्यानंतर देवाने याबाबत कौल दिला तरच पाऊस पडतो व खरीप हंगामाच्या पेरणीस सुरवात करण्याबाबतची ग्रामस्थांची श्रद्धा आहे. यावर्षी जून महिना संपता आला तरी मुबलक पाऊस लांबल्याने ग्रामस्थांनी एकत्र येत ग्रामदैवतेला ज्येष्ठ नागरिक भाऊसाहेब पवार यांच्या हस्ते महाभिषेक करून, विधीवत पूजा अर्चा करण्यात आली. त्यानंतर ग्रामदैवत श्री भैरवनाथ व देवी जोगेश्वरी यांची पूजा करत देवाला चांगला पाऊस पडू दे असे साकडे घालण्यात आले. सचिन आगलावे यांनी पौराहित्य केले.

यावेळी माजी सरपंच अमोल खवले, सूर्यकांत पवार, हनुमंत पवार, साहेबराव पवार, बाळासाहेब भुजबळ, प्रताप पवार, शिवाजी पवार, कैलास पवार, रवींद्र दुर्गाडे, भालचंद्र भुजबळ, नंदकुमार शिर्के, राजेंद्र दुर्गाडे, कांतिलाल भुजबळ आदींसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामदैवताच्या विधीवत पूजाअर्चा नंतर चांगल्या पाऊस व खरीप हंगामातील पेरणीसाठी साकडे घातल्यानंतर ग्रामदैवतेने कौल दिल्यानंतर ''नाथ साहेबाच्या नावानं चांगभलं'' च्या जयघोषात गुलालाची उधळण करीत ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. समाजआरती झाल्यानंतर शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या पेरणीसाठी बाजरी बियाणे खरेदी करण्यासाठी बाजारपेठमधील कृषी सेवा दुकानांमध्ये शेतकऱ्यांची गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले.

# ओतूर येथे विद्यार्थी गुणगौरव सोहळा

ओतूर । प्रतिनिधी

ओतूर (ता. जुन्नर) येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयात मार्च २०२४ मध्ये झालेल्या एस.एस.सी. परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे होते.




यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंतप्रधान यांच्या सुरक्षा पथकातील कमांडो राम शिंदे, बॉर्डरलेस पँथर्स ग्रुपचे संस्थापक दीपक सुकाळे, संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, खजिनदार रघुनाथ तांबे, सचिव प्रदीप गाढवे, सहसचिव पंकज घोलप, आत्माराम गाढवे, सर्जेराव गाढवे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या इंदुमती डुंबरे, माजी मुख्याध्यापक छबूराव थोरात, ज्ञानेश्वर पानसरे, संजय हिरे, शांताराम पानसरे, प्रकाश डुंबरे, संजय वल्हवणकर, नितीन तांबे, अशोक अहिनवे, शांताराम वाकर, महेंद्र पानसरे, सचिन तांबे, शिवाजी फलके आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ३७ विद्यार्थ्यांना मेडल, गुलाब पुष्प व पेढा भरवून पालकांसह गौरविले.

यावेळी राम शिंदे म्हणाले की, 'विद्यार्थ्यांनी आतापासूनच प्रतिकूल परिस्थितीवर मात करायला शिकले पाहिजे.' या समारंभाच्या निमित्ताने इंदुमती डुंबरे, विमल डुंबरे, जयश्री डुंबरे यांनी रोख १४ हजार रुपयांची बक्षिसे विद्यार्थ्यांना दिली. तसेच 'विघ्नहर'चे माजी संचालक आत्माराम गाढवे, शांताराम वाकर यांनी प्रत्येकी दोन हजार रुपयांची बक्षीसे विद्यार्थ्यांना दिली. यावेळी मंगेश तांबे, दिलीप मोरे, डॉ. सविता फलके, शरद वारुळे, अजित तांबे, अश्पाक शेख, भरत इसकांडे, वैष्णवी लंबे, सुनील यादव, रवींद्र शिंगोटे, संपत ढमाले, उत्तम थोरात, बापूराव आस्वार, नीलेश डुंबरे, मंगेश खेत्री, संतोष वीर, उमाजी डुंबरे, आमोद लांडगे आदी उपस्थित होते. शरद माळवे, संतोष कांबळे, विशाल चौधरी, अनिल जवरे, राजाराम शिंदे, अमित झरेकर, देवचंद नेहे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रास्ताविक अनिल उकिर्डे यांनी केले. सूत्रसंचालन भाऊसाहेब खाडे यांनी केले. अजित डांगे यांनी आभार मानले.

# पुण्यात सापडले स्फोटासाठी वापरले जाणारे ६७ डेटोनेटर

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात स्फोटासाठी वापरले जाणारे ६७ डेटोनेटर सापडले आहेत. पुण्याजवळील वडकीतल्या गायदरा वस्तीत ६७ डेटोनेटर सापडले आहेत. अज्ञात इसमाने डेटोनेटर ठेवल्याची माहिती मिळत आहे. अज्ञात आरोपीने इलेक्ट्रिक डेटोनेटर वायरसह ठेवल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोना निर्माण झाला. सुदैवाने याबाबतची माहिती समोर आल्याने मोठा घातपातीचा कट उधळून लावण्यास पोलिसांना यश आलं आहे. पुण्याच्या लोणी काळभोर पोलिसांनी या प्रकरणी संशयित आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

काही दिवसांपूर्वी पुण्यातील कोंढवा परिसरात तीन दहशतवाद्यांना कोथरूड येथे पोलिसांनी नाकाबंदी दरम्यान पकडले होते. या दहशतवाद्यांनी कोल्हापूर, सातारा, मुळशीतील काही परिसरात आणि या गायधरा परिसरात स्फोटाचे प्रशिक्षण घेतले असल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यातूनच हे ६७ डेटोनेटर तिथे सापडले का? याचा तपास आता पोलीस करणार आहेत. पण संबंधित प्रकरण किती भीषण आहे, याची जाणीव आता होताना दिसत आहे. संबंधित प्रकार समोर आल्यानंतर आता पुणे पोलिसांवरील जबाबदारी कितीतरी पटीने जास्त वाढल्याची चर्चा शहरात सुरु आहे.

पुणे पोलिसांनी गेल्यावर्षी जुलै महिन्यात तीन आरोपींना दुचाकी चोरीच्या संशयातून अटक केली होती. पोलिसांनी त्यांच्या घराची झाडाझडती घेतली तेव्हा पोलीसही चक्रावले होते. कारण त्यांच्या घरात एक जीवंत काडतुस, चार मोबाईल, एक लॅपटॉप आणि इतर कागदपत्रे आढळले होते. हे साहित्य पाहिल्यानंतर आरोपींचा देशविघातक कृत्यात सहभागी असल्याचा संशय पोलिसांना आला. पोलिसांनी अधिक तपास केला असता आरोपी हे एनआयएच्या फरार लिस्टमधील असल्याचं उघड झालं. पोलिसांनी पुढे दोन दहशतद्यांना एनआयएकडे सोपवलं. आरोपींकडे बॉंब बनवण्यासाठीचं आवश्यक साहित्य होतं, अशी माहिती नंतर समोर आली. यानंतर पुढच्या तपासात माहिती समोर आली की, आरोपींनी जंगलात बॉंबची ट्रायल घेतली होती. याप्रकरणी तपास यंत्रणांचा सखोल तपास सुरु आहे. या दरम्यान आता वडकीतल्या गायदरा वस्तीत ६७ डेटोनेटर सापडले आहेत. हे ६७ डेटोनेटर तिथे कसे आले? याचा तपास आता पोलीस करणार आहेत.

# किरकोळ वादातून बहिणीचा गळा दाबल्याने मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

मध्यरात्रीच्या सुमारास झोपण्यासाठी बिछाना घेण्याच्या कारणावरून बहिण-भावामध्ये झालेल्या झटापटीत भावाकडून गळा दाबला गेल्याने बहिणीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना १७ जून रोजी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास घडली. दरम्यान, याप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करून हडपसर पोलिसांनी मुलीच्या भावाला अटक केली आहे.

साफिया सुलेमान अन्सारी (वय १६, रा. वैदूवाडी, हडपसर) असे मृत्यू झालेल्या मुलीचे नाव आहे. तर शारिख सुलेमान अन्सारी (वय १८, रा. वैदूवाडी, हडपसर) असे अटक केलेल्या मुलाचे नाव आहे. याप्रकरणी सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक बर्गे यांनी हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसरमधील वैदुवाडी येथे अन्सारी कुटुंब राहतात. साफिया व शारिख हे दोघेही बहिण-भाऊ होते. १७ जून रोजी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास साफिया तिच्या खोलीमध्ये झोपली होती. त्यावेळी शारिखला झोपायचे असल्याने त्याने बिछाना घेण्यासाठी साफियाच्या खोलीचा दरवाजा ठोठावला. त्यानंतरही ती प्रतिसाद देत नसल्याने त्याने सातत्याने दरवाजा ठोठावला. त्याचा राग आल्याने साफिया खोलीच्या बाहेर आली. त्यावेळी दोघांमध्ये मोठ्या प्रमाणात भांडणे झाली. या घटनेनंतर साफिया घराच्या बाहेर निघून जात होती, तेव्हा शारिखने तिला घरात आणले. तेव्हा, साफियाने स्वयंपाकघरातील चाकू आणून शारिखला मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी झालेल्या झटापटीत शारिखने साफियाचा गळा दाबला. त्यानंतर ती बेशुद्ध पडल्याने तिला रूग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. प्रारंभी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. मात्र, तपासानंतर हा खुनाचा प्रकार असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांनी साफियाचा भाऊ शारिख याला अटक केली. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक (गुन्हे) मोडवे करत आहेत.

# राजुरी येथे टी-शर्ट वाटप

आपटाळे, : जुन्नर तालुक्याच्या दुर्गम पश्चिम आदिवासी भागातील राजुर नंबर २ येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला. येथील प्राथमिक आरोग्य तथा आयुष्यमान केंद्र यांच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमात शालेय विद्यार्थी, आरोग्य विभाग कर्मचारी व ग्रामस्थ सहभागी झाले होते. सहभागी झालेल्या नागरिकांना टी-शर्ट व औषधी वनस्पतींचे वाटप केल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रदीप गोसावी यांनी दिली. चाइल्ड फंड इंडिया या संस्थेचे सहकार्य या उपक्रमास लाभले. सुनील पवार, रंजना कदम यांनी योग प्रशिक्षण दिले. यावेळी आरोग्य अधिकारी, डॉ. श्रीहरी सारोक्ते, चाइल्ड फंड इंडिया संस्थेचे अभिजित मदने, उपसरपंच शांताराम मुंढे, पोलिस पाटील रामदास मुंढे, सुनीता पठारे यांसह विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अल्पवयीन तरुणाकडून गोळीबार

पुणे । प्रतिनिधी

विद्येचे माहेरघर आणि सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखलं जाणाऱ्या पुणे शहराची ओळख आता बदलत चालली आहे. दिवसेंदिवस पुणे शहरामध्ये गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचं दिसत आहे. अशातच पुण्यामध्ये परत एकदा गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. पुण्यामध्ये झालेला हा गोळीबार अल्पवयीन तरूणांकडून झाल्याची माहिती समजत आहे. या घटनेमुळे धायरी भागात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

पुण्यामधील धायरी भागात हा गोळीबार झाला असून अल्पवयीन तरुणाने दुसऱ्या अल्पवयीन तरुणावर झाडल्या गोळ्या झाडल्या आहेत. जुन्या भांडणाच्या रागातून हा गोळीबार करण्यात आल्याची माहिती समजत आहे. या गोळीबारामध्ये सुदैवाने अल्पवयीन तरूणाला एकही गोळी लागली नाही. ज्या ठिकाणी हा गोळीबार झाला पोलीस दाखल



झाले आहेत.

पुण्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असलेली पाहायला मिळत आहे. आताच पुणे पोर्षे कार अपघात प्रकरणामुळे पुणे चर्चेत होतं. त्याआधी कुख्यात गुंड शरद मोहोळ याची भरदिवसा गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. टोळीयुद्धा भडका उडू नये म्हणून पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सर्व गुंडांना ओळख परेड करण्यासाठी बोलावून घेतलं होतं.

दरम्यान, या पोलीस परेडवेळी नामचीन गुंड पाहायला मिळाले होते. यामध्ये गजा मारणे, बोडके ते निलेश घायवळ असे अनेक कुख्यात गुंडांना आयुक्तांनी दम भरला होता. मात्र काही दिवसांनी परत आता खुलेआम गोळीबार होण्याच्या घटना वाढताना दिसत आहेत.